



# दैनिक युवावार्ता

परिवर्तनाचा पुरस्कर्ता


Web : www.yuvavarta.in/com
Mail : dailyyuvavarta@gmail.com

◆ RNI No. MAHMAR/2007/24252 ◆

तिकीट न लावण्याचा
पोष्ट परवाना : WPP - 264
पोष्टाचा परवाना क्रमांक
BII/RNP/SRP/25/2023-25








अहिल्यानगर । वर्ष १९ वे । अंक २१५। किंमत - ४ रू । संपादिका - सुशीला किसन हासे (बी.ए.) । संस्थापक - किसन भाऊ हासे (बी.जे.) ९८२२०३९४६० । कार्य. संपादक - सुदीप किसन हासे (एम.ई.कॉम्प्.) । शुक्रवार ०४/०९/२०२६ । पाने - ६







# रस्त्याच्या प्रश्नासाठी संजय काळेंचे अर्धनग्न आंदोलन

## लाचार आणि मुर्दाड वृत्तीमुळे जनतेचे प्रचंड नुकसान



युवावार्ता (प्रतिनिधी)

राहाता - गेल्या १५ ते २० वर्षांपासून रखडलेल्या नगर-कोपरगाव महामार्गाच्या दुरवस्थेकडे शासनाचे लक्ष वेधण्यासाठी कोपरगावचे सामाजिक कार्यकर्ते संजय काळे यांनी आक्रमक आंदोलन सुरू केले आहे. सावळीविहीर फाटा ते अहिल्यानगर जिल्हाधिकारी कार्यालय असा सुमारे ७० किलोमीटरचा प्रवास ते अर्धनग्न अवस्थेत पायी करणार असून, या अनोख्या आंदोलनाची सुरुवात मंगळवारी सावळीविहीर ते राहाता या १५ किलोमीटरच्या पायी प्रवासाने झाली.

राहाता येथील छत्रपती शिवाजी महाराज चौकात पोहोचल्यानंतर शहरातील नागरिकांनी काळे यांचे स्वागत करून त्यांच्या आंदोलनाला पाठिंबा दिला.

यावेळी संजय काळे म्हणाले, या रस्त्यावर गेल्या पंधरा ते वीस वर्षांत अनेक निष्पाप नागरिकांनी जीव गमावला. मंत्री बदलले, सरकारे बदलली, राजकीय पिढ्या बदलल्या; मात्र नगर-कोपरगाव रस्त्याची दुरवस्था काही बदलली नाही. रस्ता रुंदीकरणाच्या कामात ब्रिटिशकालीन रस्त्यालगतची मोठमोठी वटवृक्ष तोडण्यात आली. त्यामुळे रस्ता बोडखा झाला; मात्र त्यानंतरही तब्बल दोन दशके उलटून गेली तरी रस्त्याचा प्रश्न कायम आहे. या काळात राज्याच्या राजकारणात अनेक चेहरे सत्तेवर आले, अनेक नेत्यांचे राजकीय वजन वाढले; मात्र जनतेच्या जीवाशी निगडित असलेल्या या रस्त्याचा प्रश्न मात्र जैसे थेच राहिला, अशी खंत काळे यांनी व्यक्त केली.

नागड्या जिल्ह्याचा प्रतिनिधी नागडाच चालणार. मात्र जनतेची लाज म्हणून कंबर झाकणार, अशी भूमिका स्पष्ट करत काळे यांनी शासनाच्या निष्क्रियतेचा निषेध केला. या आंदोलनातून शासनाने रस्त्याच्या प्रश्नाची तातडीने दखल घ्यावी, अशी त्यांची मागणी आहे.

**आठ दिवसांचा पायी प्रवास**

काळे यांच्या नियोजित आंदोलनानुसार बुधवारी राहाता ते बाभळेश्वर, त्यानंतर २७ ऑगस्टला बाभळेश्वर ते कोल्हार, १ सप्टेंबरला कोल्हार ते राहुरी फॅक्टरी, २ सप्टेंबरला राहुरी फॅक्टरी ते राहुरी विद्यापीठ, ३ सप्टेंबरला राहुरी ते देहरे, ४ सप्टेंबरला देहरे ते एमआयडीसी आणि अखेर ५ सप्टेंबरला एमआयडीसी ते अहिल्यानगर जिल्हाधिकारी कार्यालय असा पायी प्रवास करण्यात येणार आहे.

गेल्या दोन दशकांपासून रखडलेल्या या महामार्गाच्या प्रश्नासाठी सुरू झालेले हे अनोखे आंदोलन आता शासनाचे लक्ष कितपत वेधून घेते, याकडे नागरिकांचे लक्ष लागले आहे.

# राजहंस मिल्क पार्लर फोडणारे दोन सराईत पोलीसांच्या ताब्यात

## सीसीटीव्ही व तांत्रिक तपासातून चोरीचा छडा



युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - शहराजवळील कोल्हार-घोटी रस्त्यावरील समनापूर फ्लॉवर मार्केट चौफुली येथील राजहंस मिल्क पार्लरचे शटर वाकवून रोकड लंपास करणाऱ्या दोघा संशयित चोरट्यांना संगमनेर शहर पोलिसांनी अवघ्या काही तासांत जेरबंद केले. सीसीटीव्ही फुटेज आणि तांत्रिक माहितीच्या आधारे पोलिस उपनिरीक्षक श्रीकांत सावंत यांच्या पथकाने ही कारवाई केली.

समनापूर चौफुलीवरील राजहंस मिल्क पार्लर-साई अमृत मठ्ठा या बंद दुकानाचे शटर वाकवून दि. २ सप्टेंबर रोजी पहाटे ३.०८ ते ३.१५ वाजेच्या दरम्यान अज्ञात चोरट्यांनी दुकानातील ४३ हजार ८०० रुपयांची रोकड चोरून नेली. याप्रकरणी दुकानमालक सुधीर उत्तम राहींज यांच्या फिर्यादीवरून संगमनेर शहर पोलिस ठाण्यात गुन्हा क्रमांक ८३४/२०२६, बीएनएस कलम ३३१(३), ३०५ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला.

(पान ३ वर)

# दोन दुचाकींची समोरासमोर भीषण धडक

## तरूणीसह दोघांचा मृत्यू , एक गंभीर



युवावार्ता (प्रतिनिधी)

राजूर - अकोले तालुक्यातील राजूर येथील स्मशानभूमी परिसरात बुधवारी रात्री साडेसात वाजण्याच्या सुमारास स्कुटी आणि केटीएम मोटारसायकलची समोरासमोर जोरदार धडक होऊन झालेल्या भीषण अपघातात तरुणासह तरुणीचा जागीच मृत्यू झाला. या अपघातात मोटारसायकलवरील आणखी एक जण गंभीर जखमी झाला असून त्याला पुढील उपचारासाठी नाशिक येथे हलविण्यात आले आहे.

या अपघातात काजल संजय शुक्ला (वय २४, रा. राजूर, ता. अकोले) आणि अक्षय तुकाराम भोईर (वय २५, रा. रंधा, भोईरवाडी, ता. अकोले) यांचा मृत्यू झाला. तर शंकर पोपट खाडे (वय २६, रा. रंधा, भोईरवाडी, ता. अकोले) हा गंभीर जखमी झाला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, काजल शुक्ला ही स्कुटीवरून राजूरहून अकोलेच्या दिशेने जात होती. राजूर येथील स्मशानभूमी परिसरात समोरून भरधाव वेगाने येणाऱ्या केटीएम मोटारसायकलची तिच्या स्कुटीला जोरदार धडक बसली. धडक एवढी भीषण होती की, दोन्ही दुचाकींचे मोठे नुकसान झाले. अपघातात तिन्ही जण गंभीर जखमी झाले. मात्र, काजल शुक्ला आणि अक्षय भोईर यांचा घटनास्थळीच मृत्यू झाला. गंभीर जखमी झालेल्या शंकर खाडे याला तातडीने राजूर ग्रामीण रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले. मात्र, प्रकृती गंभीर असल्याने त्याला पुढील उपचारासाठी नाशिक येथे हलविण्यात आले.

काजल शुक्ला हिच्या कुटुंबीयांनी अवघ्या दोन दिवसांपूर्वीच तिच्यासाठी नवीन स्कुटी घेतली होती. (पान ४)

# पुणे-नाशिक हायस्पीड रेल्वेचा ‘स्पीड’ गायब ?

## काकोडकर समितीच्या ६० दिवसांच्या मुदतीतील २८ दिवस संपले




युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - पुणे-नाशिक सरळ सेमी हायस्पीड रेल्वेमार्गाच्या प्रतीक्षेत असलेल्या नागरिकांच्या आशेवर पुन्हा एकदा विलंबाचे सावट निर्माण झाले आहे. नारायणगाव येथील जीएमआरटी प्रकल्पामुळे निर्माण होणाऱ्या तांत्रिक अडचणींचा अभ्यास करण्यासाठी ज्येष्ठ अणुशास्त्रज्ञ डॉ. अनिल काकोडकर यांच्या अध्यक्षतेखाली तज्ज्ञ समिती स्थापन करण्यात आली. समितीला ६० दिवसांत अहवाल सादर करण्याची मुदत देण्यात आली असली, तरी या कालावधीतील तब्बल २८ दिवस उलटून गेले आहेत. मात्र, समितीच्या प्रत्यक्ष कामकाजाला अपेक्षित वेग मिळाल्याचे अद्याप स्पष्ट होत नसल्याने, ‘हायस्पीड रेल्वेचा स्पीड नेमका कुठे गायब झाला?’ असा संतप्त सवाल नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे.

पुणे-नाशिक रेल्वेचा चाकण-मंचर-नारायणगाव-संगमनेर-सिन्नर असा सरळ मार्ग असावा, ही मागणी गेल्या अनेक वर्षांपासून प्रलंबित आहे. या मार्गासाठी यापूर्वी भूसंपादनाची प्रक्रिया सुरू झाली होती, तर काही ठिकाणी बाधित शेतकऱ्यांना मोबदलाही देण्यात आल्याचे सांगितले जाते. त्यामुळे प्रकल्प प्रत्यक्ष मार्गी लागण्याची अपेक्षा निर्माण झाली होती. मात्र, नारायणगाव परिसरातील जीएमआरटी प्रकल्प आणि त्याच्या रेडिओ-सायलन्स झोनचा मुद्दा पुढे आल्याने रेल्वेमार्गाच्या तांत्रिक व्यवहार्यतेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आणि प्रकल्प पुन्हा रखडला. या पार्श्वभूमीवर शासनाने डॉ. अनिल काकोडकर यांच्या अध्यक्षतेखाली समिती स्थापन केली. समितीत रेल्वे बोर्डाचे अधिकारी तसेच (पान ३ वर)













# शताब्दी वर्षाच्या वाटचालीची सुरुवात; दंडे गोल्ड अँड डायमंड्सतर्फे 'कृष्णकथा'चे आयोजन

युवावार्ता (प्रतिनिधी)

नाशिक - १९२७ पासून सराफी व्यवसायात कार्यरत असलेल्या दंडे गोल्ड अँड डायमंड्स या सराफी पेढीच्या नाशिक रोड, सिन्नर आणि संगमनेर येथे शाखा आहेत. ग्राहकांचा विश्वास आणि सामाजिक बांधिलकी जपत विविध उपक्रम राबविणाऱ्या दंडे गोल्ड अँड डायमंड्सतर्फे आपल्या आगामी शताब्दी वर्षाच्या वाटचालीची सुरुवात एका आगळ्यावेगळ्या सांस्कृतिक कार्यक्रमाने करण्यात आली. यानिमित्ताने 'कृष्णकथा' या भव्य नृत्यकथेचे आयोजन करण्यात आले होते.

भारतीय संस्कृती आणि कलेशी असलेले नाते जपत आयोजित करण्यात आलेल्या या कार्यक्रमात कलानंद नृत्य संस्थेच्या कलाकारांनी कथक नृत्याच्या माध्यमातून भगवान श्रीकृष्णांच्या जीवनातील विविध प्रसंग साकारले. नृत्य, अभिनय, संगीत आणि भावभावनांच्या सुंदर संगमातून साकारण्यात आलेल्या या कृष्णकथेने उपस्थित रसिकांना मंत्रमुग्ध केले.



या कार्यक्रमात सुमारे ४० कलाकारांनी सहभाग घेत श्रीकृष्णांच्या जीवनातील विविध पैलू आपल्या नृत्यातून साकारले. बालकृष्णाच्या खोडकर लीला, राधा-कृष्णाचे नाते तसेच श्रीकृष्णांच्या जीवनातील विविध प्रसंग अशा अनेक भावपूर्ण सादरीकरणातून भारतीय संस्कृतीचे दर्शन घडविण्यात आले. कथक नृत्याच्या माध्यमातून सादर झालेल्या या नृत्यकथेला उपस्थित नाशिककर रसिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

दंडे गोल्ड अँड डायमंड्सच्या शताब्दी वर्षाच्या प्रवासाची सुरुवात केवळ एका कार्यक्रमाने न करता, ग्राहक आणि समाजाला विविध अनुभव देणाऱ्या उपक्रमांद्वारे करण्याचा प्रयत्न असल्याचे यावेळी सांगण्यात आले. गेली अनेक वर्षे ग्राहकांनी दंडे गोल्ड अँड डायमंड्सवर दाखविलेल्या विश्वासामुळेच हा शतकाचा प्रवास शक्य झाला असून, या विशेष वर्षाचा आनंद ग्राहक आणि समाजासोबत साजरा करण्याचा मानस पेढीने व्यक्त केला आहे.

यावेळी दंडे गोल्ड अँड डायमंड्सचे संचालक श्री. योगेश्वर दंडे म्हणाले, दंडे गोल्ड अँड डायमंड्सच्या १०० वर्षांच्या वाटचालीची सुरुवात झाली आहे. गेल्या अनेक वर्षांपासून ग्राहकांनी आमच्यावर दाखविलेल्या विश्वासामुळे हा प्रवास शक्य झाला आहे. या शताब्दी वर्षाच्या निमित्ताने आम्ही केवळ दागिन्यांपुरते मर्यादित न राहता कला, संस्कृती आणि समाजाला जोडणारे असे अनेक उपक्रम घेऊन येणार आहोत. 'कृष्णकथा' हा या विशेष प्रवासातील एक महत्त्वाचा उपक्रम असून, पुढील काळातही असे अनेक आगळेवेगळे कार्यक्रम आयोजित करण्यात येतील.

कलानंद नृत्य संस्थेच्या संस्थापक सौ. संजिवनी कुलकर्णी आणि डॉ. सुमुखी अथणी यांच्या अथक परिश्रमातून 'कृष्णकथा' हा कार्यक्रम यशस्वीपणे साकारण्यात आला. त्यांच्या मार्गदर्शनाखाली कलाकारांनी केलेल्या प्रभावी सादरीकरणाला उपस्थित रसिकांनी भरभरून दाद दिली.

यावेळी कार्यक्रमात सहभागी झालेल्या सुमारे ४० कलाकारांचा दंडे गोल्ड अँड डायमंड्सतर्फे विशेष भेटवस्तू देऊन सत्कार करण्यात आला. कलाकारांच्या उत्कृष्ट सादरीकरणाबद्दल त्यांचे कौतुक करण्यात आले.

कार्यक्रमाच्या शेवटी उपस्थित प्रेक्षकांसाठी विशेष लकी ड्रॉचे आयोजन करण्यात आले होते. यामधून दोन भाग्यवान प्रेक्षकांची निवड करण्यात आली असून त्यांना दंडे गोल्ड अँड डायमंड्सतर्फे सोन्याचे नाणे भेट देण्यात आले. या उपक्रमामुळे कार्यक्रमातील उत्साहात आणखी भर पडली. या कार्यक्रमाला विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते. दंडे गोल्ड अँड डायमंड्सतर्फे सौ. सुप्रिया दंडे, सौ. मीना दंडे, सौ. जान्हवी दंडे आणि श्री. योगेश्वर दंडे आदी उपस्थित होते.

कलानंद नृत्य संस्थेच्या 'कृष्णकथा' या सादरीकरणातून कथक नृत्यकलेची समृद्ध परंपरा आणि भारतीय संस्कृतीतील श्रीकृष्णांचे विविध पैलू रसिकांसमोर उलगडले. कलाकारांच्या प्रभावी सादरीकरणामुळे उपस्थित प्रेक्षकांनी कार्यक्रमाला भरभरून दाद दिली.

दंडे गोल्ड अँड डायमंड्सच्या आगामी १०० वर्षांच्या विशेष प्रवासात सांस्कृतिक, सामाजिक आणि ग्राहकांशी नाते अधिक दृढ करणारे विविध उपक्रम आयोजित करण्यात येणार असून, 'कृष्णकथा'च्या माध्यमातून या विशेष पर्वाची सुरुवात करण्यात आली आहे. शतकभराच्या विश्वासाचा हा प्रवास आता नव्या उत्साहाने पुढे नेताना, ग्राहक आणि समाजासोबत अनेक अविस्मरणीय क्षण साजरे करण्याचा दंडे गोल्ड अँड डायमंड्सचा प्रयत्न राहणार आहे.

# कोतूळमध्ये परवान्याच्या नावावरून वाद

## स्वातंत्र्यसैनिकाच्या कुटुंबाचा उपोषणाचा इशारा

युवावार्ता (प्रतिनिधी)

अकोले-कोतुळ येथील सीआरएल-३ परवान्याच्या नावावरून स्वातंत्र्यसैनिक काशिनाथ भाऊ डोंगरे यांच्या कुटुंबीयांचा वाद निर्माण झाला आहे. दुकानाच्या परवान्यासह व्यवसायातील हक्क दुसऱ्याच्या नावावर केल्याचा आरोप करीत डोंगरे कुटुंबीयांनी मुंबईतील आझाद मैदानावर उपोषण सुरू केले असून, या प्रकरणाची सखोल चौकशी करून न्याय मिळावा, अशी मागणी केली आहे.

काशिनाथ डोंगरे यांना कोतुळ येथे सीआरएल-३/६० परवानगी मिळाली होती. त्यांच्या निधनानंतर दुकानकामगार शिवाजी तुकाराम ऊर्फ डी. आर. देशमुख यांनी विश्वास संपादन करून व्यवसायाची जबाबदारी घेतली. त्यानंतर २००९ पासून ते स्वतः दुकान चालवत असल्याचा आरोप डोंगरे कुटुंबीयांनी केला आहे.

काशिनाथ डोंगरे यांचा मुलगा भाऊसाहेब डोंगरे हे अशिक्षित असल्याचा गैरफायदा घेत, त्यांच्या मुलाच्या नावावर परवाना करून देण्याचे सांगून प्रत्यक्षात स्वतःच्या नावावर व्यवसायातील ५१ टक्के हिस्सा करून घेतल्याचा आरोप कुटुंबीयांनी केला आहे. ही बाब निदर्शनास आल्यानंतर डोंगरे कुटुंबीयांनी संबंधितांविरोधात तक्रार दाखल केली.

दरम्यान, २०२४ मध्ये पुन्हा परवाना नावावर करून देण्याबाबत नोटरी करण्यात आल्याचा आरोपही कुटुंबीयांनी केला आहे. तसेच शिवाजी ऊर्फ डी. आर. देशमुख यांनी स्वतःच या प्रकरणी न्यायालयात केस दाखल केल्याचेही कुटुंबीयांचे म्हणणे आहे.

या संपूर्ण प्रकरणाची निष्पक्ष व सखोल चौकशी करून स्वातंत्र्यसैनिकाच्या कुटुंबाला न्याय मिळावा, तसेच व्यवसाय व परवान्याबाबतचे हक्क स्पष्ट करण्यात यावेत, अशी मागणी डोंगरे कुटुंबीयांनी केली आहे. न्याय न मिळाल्यास आंदोलन अधिक तीव्र करण्याचा इशाराही त्यांनी दिला आहे.

# काँग्रेस जिल्हाध्यक्षांच्या नाशिकमधील १० दिवसांच्या निवासी प्रशिक्षण शिबिराचा राहुल गांधींच्या उपस्थितीत समारोप

युवावार्ता (प्रतिनिधी) नाशिक-

काँग्रेसच्या 'संघटन सृजन अभियानाअंतर्गत जिल्हा काँग्रेस कमिटीच्या अध्यक्षांची निवड व नियुक्ती प्रक्रियेचा भाग म्हणून नाशिक १० दिवसीय निवासी प्रशिक्षण शिबिराचा आज लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांच्या प्रमुख मार्गदर्शनाखाली समारोपाचा कार्यक्रम झाला. दिनांक २४ ऑगस्ट पासून हे शिबिर सुरु होते.

राहुल गांधी यांचे सकाळी ओझर विमानतळावर आगमन झाले. यावेळी प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ, विधिमंडळ पक्षनेते विजय वडेट्टीवार, विधान परिषदेतील काँग्रेस पक्षाचे गटनेते सतेज ऊर्फ बंटी पाटील यांच्यासह वरिष्ठ नेत्यांनी त्यांचे स्वागत केले. त्यानंतर राहुल गांधी यांनी एमटीडीसी रिसॉर्टमध्ये सुरु असलेल्या शिबिरस्थळी राहुल गांधी यांनी राज्यातील वरिष्ठ नेत्यांशी चर्चा केली. या बैठकीला प्रांताध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ, विधिमंडळ काँग्रेस पक्षाचे नेते विजय वडेट्टीवार, विधान परिषदेतील काँग्रेस पक्षाचे गट नेते सतेज ऊर्फ बंटी पाटील, माजी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण, काँग्रेस वर्किंग कमिटीचे सदस्य बाळासाहेब थोरात, नसीम खान, खा. चंद्रकांत हंडोरे, माणिकराव ठाकरे, खा. रजनीताई पाटील, मुंबई काँग्रेस अध्यक्षा वर्षा गायकवाड, प्रणिती शिंदे, डॉ. विश्वजीत कदम, प्रदेश काँग्रेसचे वरिष्ठ उपाध्यक्ष मोहन जोशी, अखिल भारतीय काँग्रेस कमिटीचे सचिव बी.एम. संदीप, रेहाना चिश्ती, वामशी रेड्डी उपस्थित होते.



या बैठकीनंतर राहुल गांधी यांनी काँग्रेस जिल्हा काँग्रेस कमिटी अध्यक्षांच्या कुटुंबियांशी संवाद साधला. त्यानंतर शिबिराच्या समारोपाच्या कार्यक्रमात जिल्हा काँग्रेस कमिटी अध्यक्षांशी संवाद साधला तसेच संगठन विस्तार व काँग्रेसचा विचार सर्वदूर पोहचवण्याचे आवाहन केले. त्यानंतर त्यानी जिल्हाध्यक्षांना जिजित्सू मार्शल आर्ट्सची माहिती प्रात्याक्षिकासह दिली. त्यानंतर त्यांनी नाशिक पुणे छत्रपती संभाजीनगर, नागपूर येथील आंदोलनकारी आदिवासी विद्यार्थ्यांशी संवाद साधून त्यांच्या समस्या जाणून घेतल्या व काँग्रेस पक्ष त्यांच्या या लढ्यात सोबत असल्याचा विश्वास दिला. अखिल भारतीय काँग्रेस कमिटीच्या प्रशिक्षण विभागाच्या नेतृत्वाखाली हे शिबिर आयोजित करण्यात आले होते. काँग्रेसची दृष्टी व दिशा, पक्षासमोरील आव्हाने, संघटनात्मक तयारी, काँग्रेसची विचारधारा आणि देशाच्या राजकारणातील पक्षाची भूमिका यावर १० दिवसात सविस्तर चर्चा करण्यात आली. राष्ट्रीय व राज्य पातळीवरील प्रमुख नेत्यांनी शिबिरार्थींना मार्गदर्शन केले. नव्या पिढीतील कार्यकर्त्यांच्या मनातील प्रश्न, अपेक्षा, मुद्दे आणि राजकीय दृष्टिकोन या प्रशिक्षणात विशेष महत्त्व देण्यात आले.

# एसटीच्या सवलतीसाठी 'स्मार्ट कार्ड'ची सक्ती

## महिला, ज्येष्ठ नागरिकांची नवी डोकेदुखी

युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - राज्य परिवहन महामंडळाच्या (एसटी) बसमधून शासनाच्या सवलतीत प्रवास करणाऱ्या महिला तसेच ६५ ते ७५ वर्षे वयोगटातील ज्येष्ठ नागरिकांसाठी १ सप्टेंबरपासून 'एनसीएमसी' अर्थात राष्ट्रीय सामायिक गतिशीलता स्मार्ट कार्डद्वारेच सवलतीचे तिकीट देण्याची व्यवस्था लागू करण्यात आली आहे. मात्र, सवलतीचा लाभ देण्याऐवजी ही नवी व्यवस्था महिला आणि ज्येष्ठ नागरिकांसाठी डोकेदुखी ठरत असल्याची भावना व्यक्त होत आहे.



एसटीच्या एनसीएमसी स्मार्ट कार्डसाठी शासनाने १९९ रुपये शुल्क निश्चित केले आहे. कार्ड मिळविण्यासाठी आधारकार्डासह आवश्यक प्रक्रिया पूर्ण करावी लागणार असून, कार्डच्या वॉलेटमध्ये रक्कम टॉप-अप करून ठेवणेही आवश्यक आहे. त्यामुळे सवलतीचा लाभ घेण्यासाठी आधी कार्ड काढणे, त्यासाठी पैसे भरणे आणि त्यानंतर कार्डमध्ये आवश्यक रक्कम उपलब्ध ठेवणे, अशी प्रक्रिया लाभार्थ्यांना करावी लागणार आहे.

सवलत देण्याचा उद्देश आर्थिक भार कमी करणे असताना, त्याच सवलतीपर्यंत पोहोचण्यासाठीच खर्च आणि किचकट प्रक्रिया का?, असा सवाल आता उपस्थित होत आहे.

एसटी महामंडळाने प्रवाशांना डिजिटल सुविधांशी जोडण्याच्या उद्देशाने स्मार्ट कार्डची व्यवस्था केली असली, तरी ग्रामीण आणि वयोवृद्ध प्रवाशांच्या अडचणींचा विचार करणे गरजेचे आहे. सवलतीचा लाभ सहज आणि सुलभ पद्धतीने मिळणे अपेक्षित असताना, त्यासाठी शुल्क, तांत्रिक प्रक्रिया आणि टॉप-अपची अट लावल्याने ही सुविधा कितपत सर्वसमावेशक ठरेल, याबाबत प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

सवलत ही सुविधा आहे की अधिकार; मग ती मिळविण्यासाठी एवढी किचकट डिजिटल प्रक्रिया का? असा सवाल महिला आणि ज्येष्ठ नागरिकांकडून उपस्थित होत असून, एसटी महामंडळाने या निर्णयाचा ग्रामीण भागातील लाभार्थ्यांच्या दृष्टीने पुनर्विचार करावा, अशी मागणी जोर धरत आहे.

### ग्रामीण भागातील महिला, ज्येष्ठांसमोर डिजिटल अडचणी

**शहरातील डिजिटल व्यवहारांची सवय असलेल्या प्रवाशांसाठी स्मार्ट कार्डची व्यवस्था सोयीची ठरू शकते. मात्र, ग्रामीण भागातील परिस्थिती वेगळी आहे. अनेक महिला आणि ज्येष्ठ नागरिकांकडे स्मार्टफोन असला तरी डिजिटल व्यवहारांचे पुरेसे ज्ञान नसते. काहींना मोबाईलवरील संदेश वाचणेही अवघड जाते, तर ऑनलाइन बँकिंग, टॉप-अप किंवा बॅलन्स तपासण्याची प्रक्रिया अनेकांसाठी अनोळखी आहे. कार्ड काढणे, ते सक्रिय करणे, त्यात पैसे भरणे, बॅलन्स तपासणे आणि रक्कम संपल्यानंतर पुन्हा टॉप-अप करणे, या प्रत्येक टप्प्यावर त्यांना दुसऱ्याची मदत घ्यावी लागू शकते. त्यामुळे सवलत लाभार्थ्याच्या नावावर असली तरी तिचा प्रत्यक्ष लाभ घेण्यासाठी पती, मुलगा, मुलगी, नातू किंवा अन्य नातेवाईकांवर अवलंबून राहण्याची वेळ येऊ शकते.**

# भंडारदरा, कोदणी, निळवंडे जलविद्युत प्रकल्पांची कामगिरी

## तीन महिन्यांत २ कोटी ७८ लाख युनिट वीज निर्मिती

युवावार्ता (प्रतिनिधी)

राजूर - अकोले तालुक्यातील भंडारदरा, कोदणी (रंधा) आणि निळवंडे या तीन जलविद्युत प्रकल्पांनी पावसाळ्यात चांगली कामगिरी करत तीन महिन्यांत तब्बल २ कोटी ७८ लाख ३१ हजार १३० युनिट वीज निर्मिती केली आहे. त्यामुळे जलविद्युत निर्मितीला मोठी चालना मिळाली आहे.



जून ते ऑगस्ट या कालावधीत झालेल्या पावसामुळे धरणांमध्ये मोठ्या प्रमाणात पाणीसाठा उपलब्ध झाला. त्याचा उपयोग जलविद्युत निर्मितीसाठी करण्यात आला. या कालावधीत भंडारदरा जलविद्युत प्रकल्पातून सर्वाधिक १ कोटी ४६ लाख ३१ हजार १३० युनिट, तर कोदणी प्रकल्पातून ५१ लाख ७१ हजार युनिट आणि निळवंडे प्रकल्पातून सुमारे ७० लाख युनिट वीज निर्मिती झाली.

भंडारदरा प्रकल्पाची क्षमता वाढविण्यासाठी तसेच परिसरातील जलविद्युत निर्मितीचा अधिकाधिक वापर करण्यासाठी विविध उपाययोजना करण्यात येत आहेत. पावसाळ्यात धरणांमध्ये येणाऱ्या पाण्यामुळे वीजनिर्मितीला मोठी मदत होते. यंदाच्या पावसाळ्यात झालेल्या समाधानकारक पावसामुळे जलविद्युत प्रकल्पांना आवश्यक पाणी उपलब्ध झाले. परिणामी तीनही प्रकल्पांमधून विक्रमी वीजनिर्मिती झाली असून तयार झालेली वीज पुढे वीज ग्रीडला जोडण्यात येत आहे.

# पोस्टमननेच टाकला 'डाका'! ग्राहकांच्या बचत खात्यात जमा करायची १.८४ हजारांची रक्कम हडपल्याचा आरोप




युवावार्ता (प्रतिनिधी)

अकोले -ग्राहकांच्या विश्वासाचा गैरफायदा घेत शाखा डाकपालनेच तब्बल १ लाख ८४ हजार रुपयांचा अपहार केल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. समशेरपूर येथील सहायक शाखा डाकघरातील शाखा डाकपाल ओंकार गंगाधर तेलंग यांनी ग्राहकांकडून विविध खात्यांत जमा करण्यासाठी घेतलेली रक्कम खात्यात जमा न करता परस्पर हडप केल्याचे चौकशीत निष्पन्न झाले आहे. याप्रकरणी संगमनेर येथील संतोष सुरेश जोशी यांनी अकोले पोलिस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे.

फिर्यादीनुसार, १ जून २०२५ ते ७ ऑक्टोबर २०२५ या कालावधीत ओंकार तेलंग हे सावरगाव पाट शाखा डाकघरात हंगामी शाखा डाकपाल म्हणून कार्यरत होते. ग्राहकांनी विविध बचत खात्यांसाठी तसेच सुकन्या समृद्धी योजनेच्या खात्यांसाठी त्यांच्याकडे रक्कम जमा करण्यासाठी दिली होती. मात्र, ही रक्कम संबंधित खात्यांत जमा न करता तिचा अपहार करण्यात आल्याचे चौकशीत समोर आले. दरम्यान, वार्षिक तपासणीसाठी फिर्यादी संतोष जोशी सावरगाव पाट पोस्ट ऑफिसमध्ये गेले असता कार्यालय बंद आणि शाखा डाकपाल गैरहजर असल्याचे आढळून आले. यानंतर चौकशी केली असता तेलंग यांची बदली झाल्याचे समोर आले. डाक निरीक्षक काळू मारुती सदारगीर यांनी कार्यालयाची पाहणी केली असता महत्त्वाचे कार्यालयीन दप्तरही आढळून आले नाही. त्यामुळे प्रकरणातील संशय आणखी गडद झाला.

तपासणीत नवीन खात्यांसाठी स्वीकारलेल्या १ लाख ६० हजार रुपयांसह सुकन्या समृद्धी खात्यातील प्रत्येकी १२ हजार रुपये, अशी एकूण १ लाख ८४ हजार रुपयांची रक्कम अपहार झाल्याचे फिर्यादीत नमूद करण्यात आले आहे. या प्रकारामुळे ग्राहकांच्या पैशांच्या सुरक्षिततेबाबत प्रश्नचिन्ह निर्माण झाले असून डाक विभागातील या धक्कादायक प्रकाराची परिसरात चर्चा सुरू आहे. याप्रकरणी अकोले पोलिसांकडून पुढील तपास सुरू आहे.

# मनोज जरांगेंच्या उपोषणाचा ६ वा दिवस

## बीडच्या आंदोलकाचा हृदयविकाराने मृत्यू

युवावार्ता (प्रतिनिधी)

मनोज जरांगे पाटील यांच्या उपोषणाचा आज ६ वा दिवस आहे. अंतरवाली सराटीत जरांगे यांना पाठिंबा देण्यासाठी राज्यातील कानाकोपऱ्यातून समर्थक आले आहे. दरम्यान मनोज जरांगे पाटील यांना पाठिंबा देण्यासाठी आलेल्या मराठा आंदोलकाचा अंतरवाली सराटीत मृत्यू झाला आहे. दशरथ रायकर असे आंदोलकाचे नाव आहे. ते बीड जिल्ह्यातील धारुर या तालुक्यातील रहिवासी असल्याची माहिती समोर आली आहे. या घटनेने आंदोलनस्थळी आणि मराठा आंदोलकांमध्ये एकच शोककळा पसरली आहे.



दशरथ रायकर असं या मराठा आंदोलकाचं नाव असून ते बीडच्या धारूर तालुक्यातील संगम येथील रहिवासी आहेत. हृदयविकाराच्या झटक्याने मृत्यू झाल्याचा प्राथमिक अंदाज वर्तवला जात आहे. दशरथ रायकर हे जरांगे पाटलांच्या आंदोलनाला पाठिंबा देण्यासाठी अंतरवाली सराटीत आले होते. रात्री उशिरा ते अंतरवाली येथील एका शेतात झोपले होते मात्र ते सकाळी झोपेतून उठत नसल्याने त्यांना अंबड येथील रुग्णालयात दाखल करण्यात आलं मात्र डॉक्टरांनी त्यांना मृत घोषित केलं आहे. यामुळे आंदोलनस्थळी शोककळा पसरली आहे. मनोज जरांगे पाटील यांच्या उपोषणाला पाठिंबा देण्यासाठी बीड जिल्हा बंदची हाक देण्यात आलेली आहे.

शेतकऱ्यांचा श्वास ! ग्राहकांचा विश्वास !!




दर्जेदार राजहंस दूध व दूधजन्य पदार्थ
संगमनेर तालुका सह. दूध उत्पा. व प्रक्रिया संघ मर्या.
अमृतनगर (घुलेवाडी), ता. संगमनेर, जि. अहमदनगर
(०२४२५) २२५४१०, २२५५१०, २२६१६१, २२६१६२
www.rajhansmilk.com rajhansmilk@gmail.com



संगमनेरकरांनी गौरविलेले
॥जय श्रीराम॥
सुपर शॉपी
निवडक किराणा, ड्रायफुट, कॉस्मेटिक
जीवन ज्योती, गणेशनगर, संगमनेर
एस. आर. थोरात दुध व बाय प्रोडक्टस्
प्रोप्रा. अशोक रा. जाधव
फोन (०२४२५) २२१७८८,२२३६२९, मोबा. ९८२२४२५५२२
क्रेडीट कार्ड व डेबिट कार्ड वापरण्याची सुविधा

We treat He cure's
धन्वंतरी
मल्टिस्पेशालिटी हॉस्पिटल
डॉ. प्रविणकुमार पानसरे मो. ९८२२३९७५७४
डॉ. दिपाली पानसरे मो. ७४९९१७६८६४
उपलब्ध सुविधा
मेडिसीन विभाग, सर्जरी विभाग, अस्थिरोग विभाग, सुपर स्पेशालिटी सुविधा,स्त्रीरोग विभाग, न्युरो सर्जरी, प्लास्टिक सर्जरी, युरो सर्जरी, कॅन्सर सर्जरी
महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजनेअंतर्गत डायलेसिस सुविधा उपलब्ध
या योजनेअंतर्गत येणाऱ्या ऑपरेशनचा लाभ घेण्यासाठी आपले ओरिजनल आधार कार्ड व रेशनकार्ड असणे गरजेचे आहे
धन्वंतरी मल्टिस्पेशालिटी हॉस्पिटल, ताजणे मळा, नवीन नगर रोड, संगमनेर, जि. अ.नगर, फोन (०२४२५) २२७५७४, २२७५७५

आपल्या व्यवसायाची जाहीरात येथे प्रसिद्ध करा
संपर्क
८८३०५०८२४४ ८३८०९५६६०४
७६२०३८८२३०




# धांदरफळ खुर्द सबस्टेशन अंतर्गत शेतकऱ्यांना दिवसा वीज द्या; अन्यथा तीव्र आंदोलनाचा इशारा

युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर -धांदरफळ खुर्द सबस्टेशन अंतर्गत येणाऱ्या गावांमधील शेतकऱ्यांना सध्या शेतीसाठी रात्री ९.४५ ते पहाटे ५.४५ वाजेपर्यंत वीजपुरवठा करण्यात येत आहे. संपूर्णपणे रात्रीच्या अंधारात मिळणाऱ्या या वीजपुरवठ्यामुळे शेतकऱ्यांसमोर गंभीर समस्या निर्माण झाली असून, परिसरामध्ये वाढलेल्या बिबटे व वाघांच्या वावरामुळे शेतात जाण्यास शेतकरी धास्तावले आहेत.

रात्रीच्या वेळी जीव धोक्यात घालून शेतकऱ्यांना पिकांना पाणी द्यावे लागत आहे. अनेक शेतकरी वन्यप्राण्यांच्या भीतीमुळे रात्री शेतात जाणे टाळत असल्याने पिकांना वेळेवर पाणी देता येत नाही. परिणामी अनेक पिके पाण्याअभावी सुकण्याच्या मार्गावर असल्याची परिस्थिती निर्माण झाली आहे.

या गंभीर प्रश्नाची प्रशासनाने तातडीने दखल घेऊन धांदरफळ खुर्द सबस्टेशन अंतर्गत येणाऱ्या सर्व गावांतील शेतकऱ्यांना दिवसाच्या वेळेत वीजपुरवठा उपलब्ध करून द्यावा, अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते दत्ताभाऊ कोकणे यांनी केली आहे.

शेजारील अकोले तालुक्यात काही भागांमध्ये दोन शिफ्टमध्ये वीजपुरवठा करण्यात येत असून काही भागांतील शेतकऱ्यांना दिवसा वीज उपलब्ध करून दिली जात आहे. मग धांदरफळ खुर्द सबस्टेशन अंतर्गत येणाऱ्या शेतकऱ्यांवरच रात्रीच्या अंधारात शेती करण्याची वेळ का यावी, असा सवालही शेतकऱ्यांकडून उपस्थित करण्यात येत आहे.

धांदरफळ खुर्द सबस्टेशन अंतर्गत येणाऱ्या गावांमध्ये शेतकऱ्यांना दिवसाच्या शिफ्टमध्ये सात तास वीजपुरवठा करण्यात यावा. तसेच रात्रीच्या शिफ्टमधील वीजपुरवठ्यात बदल करून शेतकऱ्यांना दिवसा किमान आठ तास वीज उपलब्ध करून द्यावी, अशी मागणी दत्ताभाऊ कोकणे यांनी प्रशासनाकडे केली आहे.

प्रशासनाने तातडीने यावर योग्य तो निर्णय घेऊन वीजपुरवठ्याच्या वेळेत बदल करावा. अन्यथा येत्या दोन दिवसांत धांदरफळ खुर्द सबस्टेशनवर शेतकऱ्यांच्या वतीने तीव्र आंदोलन करण्यात येईल, असा स्पष्ट इशारा सामाजिक कार्यकर्ते दत्ता कोकणे यांनी दिला आहे.

# बिबट्याच्या दहशतीत कृष्णाचा बळी; थोरातांकडून कुटुंबीयांचे सांत्वन

युवावार्ता(प्रतिनिधी)

संगमनेर- जवळेकडलग येथील अकरा वर्षीय कृष्णा वसंत पवार याचा बिबट्याच्या भीतीने शेततळ्यात पडून मृत्यू झाला. ही घटना अत्यंत दुर्दैवी असून सध्या ग्रामीण भागामध्ये बिबट्यांचे वाढते हल्ले हे चिंताजनक आहे. यामुळे नागरिक व विद्यार्थी भयभीत आहेत. यावर प्रशासन व वन विभागाने अत्यंत ठोस उपाय योजना करण्याचे गरजेचे असल्याचे प्रतिपादन राज्याचे माजी महसूल व कृषिमंत्री बाळासाहेब थोरात यांनी केले असून त्यांनी आज जवळेकडलग येथे पवार कुटुंबीयांची भेट घेऊन सांत्वन केले.

जवळेकडलग येथील वसंत पवार यांच्या निवासस्थानी काँग्रेसच्या राष्ट्रीय वर्किंग कमिटीचे सदस्य माजी महसूल मंत्री बाळासाहेब थोरात यांनी सांत्वन भेट दिली यावेळी समवेत जिल्हा परिषद सदस्य रामहरी कातोरे, पंचायत समिती सदस्य विष्णुपंत रहाटळ, गुलाबराव देशमुख, राजेंद्र कडलक, गिरीश सुर्वे, नानासाहेब वामन, उत्तम सुर्वे, संजय देशमुख, सुरेश कडलग, दत्ता कडलग, गणेश कडलग, सुमित देशमुख, सौरभ कडलग, चेतन देशमुख, त्यांच्यासह गावातील कार्यकर्ते व पदाधिकारी युवक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

बिबट्याच्या भीतीने अकरा वर्षाच्या कृष्णा याचा शेजारी असलेल्या शेततळ्यात पडून मृत्यू झाला. ही घटना समजतात काँग्रेस पक्षाचे नेते बाळासाहेब थोरात यांनी समाज माध्यमांवरून शोक व्यक्त केला याचबरोबर तातडीने आपल्या कार्यकर्ते व



यंत्रणेला संबंधित परिवाराला मदतीसाठी सूचना केल्या.

जळगाव, धुळे ,पुणे ,नाशिक दौऱ्यानंतर आज माजी मंत्री बाळासाहेब थोरात यांनी तातडीने जवळेकडलग येथे जाऊन पवार कुटुंबियांचे सांत्वन केले. याप्रसंगी बोलताना माजी मंत्री बाळासाहेब थोरात म्हणाले की बिबट्याचे राज्यभरात आणि आपल्या भागात दिवसेंदिवस वाढणारे हल्ले हे अत्यंत चिंताजनक आहे यामुळे ग्रामीण भागातील नागरिक महिला विशेषता विद्यार्थी भयभीत आहे. शासनाकडे याबाबत आपण कायम पाठपुरावा केला असून या समस्येवर कायमस्वरूपी ठोस उपाय योजना होणे गरजेचे आहे.

अनेक नागरिक शेतामध्ये रात्रीचे पाणी भरण्यासाठी जात असतात याचबरोबर विद्यार्थी शाळेत येत जात असतात आणि आपल्या परिसरात आणि भागामध्ये नागरिकांचे वास्तव हे जास्त वास्त्यांवरती आहे. त्यामुळे भीती जास्त वाटते. वनविभाग व प्रशासनाने याबाबत अधिक सतर्कतेने काम केले पाहिजे. मात्र त्यांची उदासीनता चिंताजनक असल्याचे ते म्हणाले याचबरोबर सर्व शेतकऱ्यांनी आपल्या शेततळ्याच्या बाजूला संरक्षण जाळी बांधून घेणे अत्यंत गरजेचे असल्याचे ते म्हणाले

तर रामहरी कातोरे म्हणाले की लोकनेते बाळासाहेब थोरात यांनी बिबट्यांच्या वाढत्या हल्ल्याबाबत प्रशासनाला कायम सतर्क केले आहे. तर विष्णुपंत रहाटळ म्हणाले की आमच्या गावातील ही दुसरी घटना आहे त्यामुळे प्रशासनाने अधिक लक्ष द्यावे असे ते म्हणाले.

# पान १ वरून - पुणे-नाशिक हायस्पीड...

पुणे आणि नाशिक विभागीय आयुक्तांचा समावेश आहे. जीएमआरटीच्या रेडिओ-सायलन्स झोनवर रेल्वेमार्गाचा होणारा संभाव्य परिणाम, त्यावर उपलब्ध तांत्रिक उपाय आणि मूळ मार्ग कायम ठेवण्याची शक्यता यांचा अभ्यास करून समितीने शासनाला अहवाल देणे अपेक्षित आहे.

समिती स्थापन झाली; पण कामाला सुरुवात कधी?

समितीला ६० दिवसांची मुदत देण्यात आली असताना त्यातील जवळपास निम्मा कालावधी संपत आला आहे. विशेष म्हणजे, समितीचे अध्यक्ष डॉ. काकोडकर यांनाच शासनाकडून समितीच्या कामकाजाबाबत अधिकृत माहिती मिळालेली नसल्याचा दावा आमदार सत्यजित तांबे यांनी केला आहे. त्यामुळे समिती कागदावर स्थापन झाली असली, तरी प्रत्यक्ष बैठका, तांत्रिक अभ्यास आणि पाहणीचे काम कधी सुरू होणार, असा सवाल आता उपस्थित होत आहे.

एकीकडे काकोडकर समितीला मूळ पुणे-नाशिक सरळ मार्गाचा तांत्रिक अभ्यास करून अहवाल देण्याची जबाबदारी देण्यात आली आहे. तर दुसरीकडे नाशिक रोड-शिर्डी दुहेरी रेल्वेमार्गासाठी भूसंपादनाची अधिसूचना प्रसिद्ध झाल्याने या संपूर्ण प्रकरणातील संभ्रम आणखी वाढला आहे.

काकोडकर समितीचा अंतिम अहवाल येण्यापूर्वीच पर्यायी मार्गाच्या हालचालींना वेग दिला जात असल्याचा आक्षेप घेतला जात आहे. त्यामुळे सरकारचा नेमका प्राधान्यक्रम कोणता? मूळ पुणे-नाशिक सरळ मार्ग की शिर्डीमार्गे पर्यायी मार्ग? याबाबत सरकारने स्पष्ट भूमिका जाहीर करावी, अशी मागणी होत आहे.

पुणे-नाशिक रेल्वेचा प्रश्न गेल्या अनेक वर्षांपासून चर्चेत आहे. प्रत्येक वेळी नवा अभ्यास, नवी समिती आणि नव्या आश्वासनांमुळे नागरिकांच्या पदरी केवळ प्रतीक्षाच पडत असल्याची भावना आहे. त्यामुळे आता पुन्हा 'समिती नेमली, अहवाल येईल आणि निर्णय घेतला जाईल' या चक्रात हा प्रकल्प अडकू नये, अशी तीव्र अपेक्षा व्यक्त होत आहे.

काकोडकर समितीला दिलेली ६० दिवसांची मुदत कोणत्याही परिस्थितीत वाढवू नये, निर्धारित कालावधीत तांत्रिक अभ्यास पूर्ण करून ठोस आणि अंतिम अहवाल सादर करावा आणि त्यानंतर शासनाने विलंब न करता निर्णय घ्यावा, अशी मागणी जोर धरत आहे.

संगमनेरकरांच्या नजरा आता समितीच्या अहवालाकडे- पुणे-नाशिक रेल्वेचा मूळ सरळ मार्ग कायम ठेवून संगमनेरसह चाकण, मंचर, नारायणगाव आणि सिन्नर परिसरातील नागरिकांना थेट रेल्वे जोडणी मिळावी, ही या भागातील नागरिकांची अनेक वर्षांची मागणी आहे. त्यामुळे आता काकोडकर समितीच्या अहवालाकडे संपूर्ण उत्तर महाराष्ट्राचे लक्ष लागले आहे.

६० दिवसांची मुदत संपण्यापूर्वी समिती प्रत्यक्षात कामाला लागणार का, मूळ सरळ मार्गाला हिरवा कंदील मिळणार का आणि पुणे-नाशिक हायस्पीड रेल्वेचा रखडलेला 'स्पीड' पुन्हा पकडणार का? याचे उत्तर आता शासनाच्या भूमिकेतूनच मिळणार आहे.

पान १ वरून

# राजहंस मिल्क पार्लर...

घटनेनंतर शहर पोलिस निरीक्षक समीर बारवकर यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस उपनिरीक्षक श्रीकांत सावंत यांच्या पथकाने परिसरातील सीसीटीव्ही फुटेज तपासण्यासह तांत्रिक माहितीच्या आधारे तपास सुरू केला. तपासात संशयितांचा सहभाग निष्पन्न झाल्यानंतर प्रेम विजय वाल्हेकर (वय २४, रा. आठरापगड, वेल्हाळे रोड, संगमनेर) आणि उमेश गुलाब जारे (वय २०, रा. म्हसोबानगर, थोरात कारखान्याच्या पाठीमागील माळरान, संगमनेर) यांना दि. २ सप्टेंबर रोजी रात्री १०.०३ वाजता अटक करण्यात आली.

पोलिसांनी आरोपींकडून चोरीसाठी वापरलेले साहित्यही जप्त केले आहे. यामध्ये लोखंडी पहार, कटर, स्क्रू ड्रायव्हर, पक्कड, विविध आकाराचे पाना तसेच इतर साहित्याचा समावेश असून त्याची एकूण किंमत २ हजार ४५० रुपये आहे. याशिवाय एक मोटारसायकलही जप्त करण्यात आली आहे.

दरम्यान, अटक आरोपींपैकी प्रेम वाल्हेकर हा अभिलेखावरील सराईत गुन्हेगार असून त्याच्यावर यापूर्वी अशाच स्वरूपाचे गुन्हे दाखल असल्याचे पोलिसांनी सांगितले. या चोरीत आणखी साथीदारांचा सहभाग आहे का, चोरीची रोकड कोठे लपवली किंवा तिची विल्हेवाट कशी लावली, तसेच आरोपींनी संगमनेर शहरासह अन्य ठिकाणी अशाच प्रकारचे गुन्हे केले आहेत का, याचा तपास पोलिसांकडून सुरू आहे. चोरीचा गेलेला मुद्देमाल हस्तगत करणे, गुन्ह्यात वापरलेले वाहन जप्त करणे आणि अन्य आरोपींचा शोध घेण्यासाठी तपास महत्त्वाचा असल्याने दोन्ही आरोपींना चार दिवसांची पोलीस कोठडी मिळावी, अशी मागणी तपासी अधिकारी पोलीस उपनिरीक्षक श्रीकांत सावंत यांनी न्यायालयाकडे केली आहे.

याबाबत डीवायएसपी कुणाल सोनवणे यांनी सांगितले की, सदर आरोपीने अनेक गुन्ह्यांची कबुली दिली असून लवकरच अनेक गुन्ह्यांची उकल होईल. पुढील तपास पोलीस निरीक्षक समीर बारवकर यांच्या मार्गदर्शनाखाली उपनिरिक्षक श्रीकांत सावंत करत आहे.

# अध्यक्ष खर्गे सभा 'शुद्धीकरणा'च्या निषेधार्थ संगमनेरात काँग्रेसचा एल्गार

युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष तथा खासदार मल्लिकार्जुन खर्गे यांच्या हल्द्वानी (उत्तराखंड) येथील सभास्थळाचे काही समाजकंटकांनी गंगाजलाने शुद्धीकरण केल्याच्या कथित घटनेच्या निषेधार्थ संगमनेरात काँग्रेसच्या अनुसूचित जाती विभागाच्या वतीने आक्रमक भूमिका घेण्यात आली. या घटनेचा तीव्र निषेध नोंदवत संबंधितांवर कठोर कारवाई करण्याची मागणी करण्यात आली.



याबाबत अहिल्यानगर जिल्हा काँग्रेस कमिटीच्या अनुसूचित जाती विभागाच्या वतीने प्रांताधिकारी तथा उपविभागीय दंडाधिकारी विलास उंडे आणि उपविभागीय पोलीस अधिकारी डॉ. कुणाल सोनवणे यांना निषेधाचे निवेदन देण्यात आले.

निवेदनात म्हटले आहे की, मल्लिकार्जुन खर्गे हे देशातील ज्येष्ठ आंबेडकरवादी नेते असून, केवळ ते दलित समाजातून येतात म्हणून त्यांच्या सभास्थळाचे शुद्धीकरण करणे हा सामाजिक समतेचा, भारतीय संविधानाचा आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांचा अवमान आहे. अशा प्रकारच्या घटनांमधून मनुवादी मानसिकता समोर येत असून, ती कदापि सहन केली जाणार नाही.

या घटनेमुळे अहिल्यानगर जिल्ह्यातील आंबेडकरी व पुरोगामी समाजात तीव्र संताप निर्माण झाला असून, संबंधितांवर अनुसूचित जाती-जमाती अत्याचार प्रतिबंधक (अट्रॉसिटी) कायद्यानुसार गुन्हा दाखल करून कठोर कारवाई करावी, अशी मागणी करण्यात आली. कारवाई न झाल्यास जिल्हाभर तीव्र आंदोलन छेडण्याचा इशाराही काँग्रेसच्या वतीने देण्यात आला.

यावेळी अहिल्यानगर जिल्हा काँग्रेस कमिटी अनुसूचित जाती विभागाचे जिल्हाध्यक्ष बंटी यादव, आंबेडकरी चळवळीचे ज्येष्ठ नेते के. एस. नाना गायकवाड, जिल्हा काँग्रेसचे कार्याध्यक्ष अरुण गावित्रे, ज्येष्ठ आंबेडकरवादी नेते के. पी. बनसोडे, जिल्हा काँग्रेसचे उपाध्यक्ष शशिकांत थोरात, सरचिटणीस रामनाथ गायकवाड, संगमनेर शहर काँग्रेसचे अध्यक्ष सोनू गायकवाड, पॅन्थर विनोद गायकवाड, जिल्हा काँग्रेस सोशल मीडिया समन्वयक उदय अभंग, महेश हांडे यांच्यासह काँग्रेसचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# राजूर अप्पर तहसील समावेशाला कोतूळ ग्रामस्थांचा विरोध; दुपारपर्यंत गाव बंद



युवावार्ता (प्रतिनिधी)

राजूर - : प्रस्तावित राजूर अपर तहसील कार्यालयाच्या क्षेत्ररचनेत कोतुळ गावाचा समावेश करण्याच्या निर्णयाला कोतुळ परिसरातील ग्रामस्थांनी तीव्र विरोध दर्शविला आहे. या निर्णयाचा निषेध नोंदवित मंगळवारी कोतुळ गावातील सर्व व्यवहार दिवसभर बंद ठेवण्यात आले. तसेच कोतुळचा समावेश अकोले तहसील क्षेत्रातच कायम ठेवावा, अशी जोरदार मागणी ग्रामस्थांनी केली.

या पार्श्वभूमीवर कोतुळ येथे ग्रामस्थांची जाहीर सभा आयोजित करण्यात आली. सभेत प्रस्तावित राजूर अपर तहसीलच्या क्षेत्रात कोतुळचा समावेश करू नये, असा ठराव एकमताने करण्यात आला. ग्रामस्थांनी गाव बंद ठेवून प्रशासनाच्या प्रस्तावाविरोधात आपली तीव्र नाराजी व्यक्त केली.

सभेत सेवानिवृत्त प्रशासकीय अधिकारी बी. जे. देशमुख, जिल्हा परिषदेचे माजी उपाध्यक्ष सीताराम पाटील, शंकर बोपले, संजय देशमुख यांच्यासह विविध मान्यवरांनी भूमिका मांडली. कोतुळ गावाचे सामाजिक, शैक्षणिक, आर्थिक तसेच दैनंदिन व्यवहार पूर्वीपासून अकोले शहराशी निगडित आहेत. त्यामुळे प्रशासकीय पुनर्रचनेच्या नावाखाली कोतुळचा राजूर अपर तहसीलमध्ये समावेश करणे ग्रामस्थांच्या दृष्टीने गैरसोयीचे ठरेल, असा सूर सभेत उमटला.

कोतुळचा अकोले तहसीलशी असलेला दीर्घकाळाचा प्रशासकीय व सामाजिक संबंध लक्षात घेऊन प्रस्तावित क्षेत्ररचनेचा निर्णय तातडीने बदलावा, अशी मागणी यावेळी करण्यात आली. ग्रामस्थांच्या मागणीची दखल घेतली नाही, तर आगामी काळात आंदोलन अधिक तीव्र करण्यात येईल, असा इशाराही देण्यात आला.या आंदोलनात विविध क्षेत्रांतील नागरिक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

# मालपाणी विद्यालयाच्या सिद्धी जाधवची रायफल शूटिंगमध्ये चमकदार कामगिरी; राष्ट्रीय स्पर्धेसाठी निवड

युवावावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - येथील मालपाणी विद्यालयाची विद्यार्थिनी सिद्धी दिनेश जाधव (इयत्ता ९ वी) हिने छत्रपती संभाजीनगर येथे नुकत्याच संपन्न झालेल्या महाराष्ट्र एअर गन अँड फायरआर्म्स कॉम्पिटिशन २०२६ या राज्यस्तरीय स्पर्धेत १० मीटर एअर रायफल शूटिंग प्रकारात उत्कृष्ट कामगिरी करत घवघवीत यश संपादन केले. या उल्लेखनीय कामगिरीच्या जोरावर तिची राष्ट्रीय स्पर्धेसाठी निवड झाली आहे.



रायफल शूटिंग हा केवळ अचूक नेमबाजीचा खेळ नसून एकाग्रता, संयम, मानसिक स्थैर्य, शरीराचा समतोल आणि आत्मविश्वास यांची कसोटी पाहणारा कौशल्याधारित खेळ आहे. १० मीटर एअर रायफल प्रकारात लक्ष्याच्या मध्यभागी अचूक निशाणा साधण्यासाठी खेळाडूला श्वासावर नियंत्रण ठेवून अत्यंत शांत, स्थिर आणि एकाग्र मनाने प्रत्येक शॉट घ्यावा लागतो. त्यामुळे या खेळाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांमध्ये शिस्त, एकाग्रता, संयम आणि निर्णयक्षमता विकसित होण्यास मदत होते.

महाराष्ट्र रायफल शूटिंग असोसिएशन, वरळी, मुंबई यांच्या वतीने आयोजित या राज्यस्तरीय स्पर्धेत महाराष्ट्रातील विविध जिल्ह्यांमधील खेळाडूंनी सहभाग घेतला. सिद्धीने आपल्या सातत्यपूर्ण सराव, अचूक नेमबाजी, तांत्रिक कौशल्य आणि आत्मविश्वासाच्या जोरावर प्रभावी कामगिरी करत राष्ट्रीय स्तरावरील स्पर्धेत स्थान निश्चित केले.

सिद्धीला डायमंड ग्लोरी रायफल अँड पिस्टल शूटिंग स्पोर्ट्स प्रशिक्षण संस्थेचे संचालक रवींद्र कदम यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले. त्यांच्या मार्गदर्शनाखाली सिद्धीने नियमित सराव, नेमबाजीतील तंत्र आणि मानसिक तयारी यावर विशेष मेहनत घेत हे उल्लेखनीय यश संपादन केले.

सिद्धीच्या या यशाबद्दल माजी नगराध्यक्षा दुर्गाताई तांबे, संस्थेच्या अध्यक्षा सुवर्णाताई मालपाणी, सचिव सतीश लाहोटी, माजी क्रीडाशिक्षक सूर्यभान नवले, मुख्याध्यापक उत्तम एरंडे आणि पर्यवेक्षिका रंजना पवार यांच्या उपस्थितीत तिचा समारंभपूर्वक सत्कार करण्यात आला. यावेळी सिद्धीला राष्ट्रीय स्पर्धेसाठी शुभेच्छा देण्यात आल्या.

## संपादकीय...

# नेपाळचा जलप्रलय

नेपाळ म्हटले की डोळ्यांसमोर उभे राहतात ते हिमालयाचे उत्तुंग पर्वत, हिरवाईने नटलेली दऱ्याखोरी, वेगाने वाहणाऱ्या नद्या आणि निसर्गाच्या कुशीत वसलेली छोटी-छोटी गावे. मात्र याच निसर्गरम्य नेपाळवर जलप्रलयाचे संकट कोसळले आणि हजारो नागरिकांचे जीवन उद्ध्वस्त झाले. पुराचे पाणी ओसरले तरी संकट संपलेले नाही. अनेक नागरिक बेपत्ता आहेत, असंख्य कुटुंबे उद्ध्वस्त झाली आहेत आणि पर्वतीय भागातील दरडी, हिमस्खलन व नद्यांच्या बदलत्या प्रवाहामुळे नव्या आपत्तीची भीती कायम आहे. हा केवळ नेपाळचा प्रश्न नाही; हिमालयीन प्रदेशातील बदलत्या पर्यावरणाचा हा गंभीर इशारा आहे. नैसर्गिक आपत्ती अचानक येते, असे आपण नेहमी म्हणतो. मात्र प्रत्येक आपत्ती पूर्णपणे अनपेक्षित असतेच असे नाही. हवामानातील बदल, अनियमित पर्जन्यमान, हिमनद्या वेगाने वितळणे, जंगलतोड, नदीपात्रांवरील अतिक्रमणे आणि नियोजनाविना होणारा विकास या सगळ्यांचा परिणाम आपत्तीची तीव्रता वाढवतो. पर्वतीय भागात एका ठिकाणी दरड कोसळली किंवा नदीचा प्रवाह अडला की काही काळाने अडलेले पाणी प्रचंड वेगाने खाली येते. त्यावेळी नदीच्या मार्गातील मानवी वस्त्या, रस्ते, पूल आणि पायाभूत सुविधा काही क्षणांत वाहून जाण्याची शक्यता असते. नेपाळच्या सध्याच्या संकटाने आणखी एका वास्तवाकडे लक्ष वेधले आहे. हिमालय हा केवळ नेपाळचा भौगोलिक प्रदेश नाही. भारत, नेपाळ, भूतान, चीन आणि पाकिस्तान या देशांच्या जलसुरक्षेशी हिमालयाचा थेट संबंध आहे. हिमालयातून उगम पावणाऱ्या नद्या कोट्यवधी लोकांच्या जीवनाचा आधार आहेत. त्यामुळे हिमालयातील पर्यावरणीय बदलांचा परिणाम सीमारेषा ओलांडून दूरवर जाणार आहे. आज नेपाळमध्ये आलेला जलप्रलय उद्या भारतातील हिमालयीन राज्यांसमोरही गंभीर प्रश्न निर्माण करू शकतो. या पार्श्वभूमीवर भारताची भूमिका महत्त्वाची ठरते. संकटाच्या काळात शेजारी राष्ट्राला मदतीचा हात देणे ही केवळ मानवतावादी जबाबदारी नाही, तर भारत-नेपाळ संबंधातील विश्वास अधिक दृढ करणारी बाब आहे. बचाव पथके, वैद्यकीय मदत, औषधे, अन्नधान्य आणि आवश्यक साहित्य पोहोचविण्याबरोबरच बेपत्ता नागरिकांचा शोध, मृतांची ओळख आणि विस्थापितांचे पुनर्वसन यासाठी दीर्घकालीन सहकार्याची गरज आहे. आपत्ती संपल्यानंतर माध्यमांचे लक्ष दुसरीकडे वळते; परंतु पीडितांच्या आयुष्यातील संकट तेव्हा सुरू झालेले असते. विशेषतः अज्ञात मृतदेहांचा प्रश्न अत्यंत संवेदनशील आहे. पुरात वाहून गेलेल्या आणि ढिगाऱ्याखाली सापडलेल्या मृतदेहांची ओळख पटविणे ही प्रशासनासाठी मोठी कसोटी असते. अशा वेळी धार्मिक आणि सामाजिक भावना जपत वैज्ञानिक पद्धतीने डीएनए नमुने, छायाचित्रे आणि इतर नोंदी जतन करणे आवश्यक आहे. मृत व्यक्तीची ओळख पटणे ही केवळ प्रशासकीय प्रक्रिया नसून त्यांच्या कुटुंबाला मिळणाऱ्या अंतिम मानसिक आधाराचा भाग आहे. या जलप्रलयातून नेपाळने केवळ मदत मागण्यापेक्षा भविष्यातील आपत्ती व्यवस्थापनाची नवी चौकट उभी करण्याची गरज आहे. नदीपात्रांचे वैज्ञानिक मॅपिंग, पूरपूर्व इशारा प्रणाली, पर्वतीय भागातील दरड निरीक्षण, हवामानाचा अचूक अंदाज, सुरक्षित स्थलांतर मार्ग आणि स्थानिक नागरिकांचे प्रशिक्षण यावर मोठ्या प्रमाणात गुंतवणूक करावी लागेल. आपत्ती आल्यानंतर बचाव करण्यापेक्षा आपत्ती येण्यापूर्वी जीव वाचविणे हेच खरे आपत्ती व्यवस्थापन आहे. विकास आणि पर्यावरण यांच्यात संघर्ष असण्याची गरज नाही; मात्र विकासाची दिशा निसर्गाच्या मर्यादा ओळखणारी असली पाहिजे. डोंगर फोडून रस्ते, नदीकाठावर अनियंत्रित बांधकामे आणि जंगलतोड करून उभारल्या जाणाऱ्या वसाहती विकासाचे प्रतीक मानल्या जाऊ शकत नाहीत. निसर्गाच्या नियमांकडे दुर्लक्ष करून केलेला विकास शेवटी मानवी जीवितासाठीच धोकादायक ठरतो. नेपाळचा जलप्रलय त्यामुळे केवळ एका देशाची शोकांतिका म्हणून पाहून चालणार नाही. हा संपूर्ण हिमालयीन पट्ट्यासाठी धोक्याची घंटा आहे. हवामान बदलाच्या पार्श्वभूमीवर भारत आणि नेपाळसह हिमालयाशी संबंधित सर्व देशांनी एकत्र येऊन जलव्यवस्थापन, हवामान निरीक्षण आणि आपत्तीपूर्व सूचना यासाठी संयुक्त यंत्रणा उभी करण्याची वेळ आली आहे. आज नेपाळ दुःखात आहे. हजारो कुटुंबांच्या डोळ्यांत अश्रू आहेत. पण या अश्रूंमधून भविष्यासाठी धडा घेतला नाही, तर उद्याची आपत्ती अधिक भयंकर असू शकते. निसर्गाला आव्हान देण्यापेक्षा त्याच्याशी समतोल साधणे, हीच नेपाळच्या जलप्रलयाची सर्वात मोठी शिकवण आहे. नेपाळच्या या आपत्तीने आपत्ती व्यवस्थापनाच्या तयारीवरही गंभीर प्रश्नचिन्ह उभे केले आहे. पूर, दरडी आणि हिमस्खलन यांचा धोका असलेल्या भागात नागरिकांना वेळीच सुरक्षित स्थळी हलविण्यासाठी सक्षम यंत्रणा उभारणे गरजेचे आहे. स्थानिक प्रशासन, सुरक्षा यंत्रणा आणि नागरिक यांच्यात समन्वय वाढवून पूर्वसूचना मिळताच तातडीने स्थलांतर करता आले पाहिजे. आपत्तीच्या काळात मदत पोहोचविण्याबरोबरच भविष्यात अशा दुर्घटनांमध्ये जीवितहानी कमीत कमी करण्यासाठी 'आपत्तीनंतरची मदत' नव्हे, तर 'आपत्तीपूर्व तयारी' याला प्राधान्य देणे हीच काळाची गरज आहे.

# पोदार इंटरनॅशनल स्कूल, संगमनेरच्या विद्यार्थ्यांची बॉक्सिंगमध्ये दमदार कामगिरी



युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर : क्रीडा क्षेत्रात सातत्याने उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या पोदार इंटरनॅशनल स्कूल, संगमनेरच्या विद्यार्थ्यांनी उइडए डींह नेपश २ डेळपस उहराळिपीहळ२०२६-२७ मध्ये उत्कृष्ट कामगिरी करत शाळेच्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा खोवला आहे. या स्पर्धेत शाळेच्या तीन विद्यार्थ्यांनी आपल्या उत्कृष्ट खेळाचे प्रदर्शन करत तीन कांस्यपदकांची कमाई केली.

दक्षिण भारतातील विविध राज्यांमधून आलेल्या जवळपास ११०० खेळाडूंनी या प्रतिष्ठेच्या बॉक्सिंग स्पर्धेत सहभाग नोंदवला होता. त्यामुळे स्पर्धेला मोठी रंगत प्राप्त झाली होती. अत्यंत चुरशीच्या आणि आव्हानात्मक सामन्यांमध्ये पोदार इंटरनॅशनल स्कूलच्या विद्यार्थ्यांनी आत्मविश्वास, शिस्त, जिद्द आणि उत्कृष्ट क्रीडाकौशल्याचे दर्शन घडवत उल्लेखनीय यश संपादन केले. १४ वर्षांखालील मुलांच्या गटात मास्टर कृष्णराज कैलास गुंजाळ याने ४० ते ४२ किलो वजनी गटात दमदार कामगिरी करत कांस्यपदक पटकावले. त्याच गटात मास्टर स्वराज समीर शिंदे याने ४२ ते ४४ किलो वजनी गटात उत्कृष्ट खेळाचे प्रदर्शन करत कांस्यपदक मिळवले. तसेच १७ वर्षांखालील मुलींच्या गटात कु. तनिष्का अमोल सारंगधार हिने ४४ ते ४६ किलो वजनी गटात आत्मविश्वासपूर्ण खेळ करत कांस्यपदकावर आपले नाव कोरले. तीनही खेळाडूंनी स्पर्धेदरम्यान दाखविलेली जिद्द, चिकाटी आणि उत्कृष्ट तांत्रिक कौशल्य विशेष कौतुकास्पद ठरले.

विद्यार्थ्यांच्या या यशामागे त्यांचे सातत्यपूर्ण सराव, कठोर परिश्रम आणि प्रशिक्षकांचे मोलाचे मार्गदर्शन महत्त्वपूर्ण ठरले. बॉक्सिंग प्रशिक्षक श्री. परमानंद बेलभक्ते यांनी विद्यार्थ्यांना नियमित सराव, तांत्रिक मार्गदर्शन आणि सामन्यांसाठी आवश्यक मानसिक तयारी करून घेतली. त्यांच्या मार्गदर्शनामुळे विद्यार्थ्यांना स्पर्धेत आत्मविश्वासाने सामोरे जाण्यास मोठी मदत झाली. अभ्यासाबरोबरच विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाला प्राधान्य देत त्यांच्या क्रीडागुणांना योग्य व्यासपीठ उपलब्ध करून देण्याच्या शाळेच्या प्रयत्नांना या यशामुळे निश्चितच बळ मिळाले आहे.

या उल्लेखनीय यशाबद्दल पोदार इंटरनॅशनल स्कूल, संगमनेरच्या प्राचार्या मीनाक्षी मिश्रा आणि उपप्राचार्य योगेश आवारी यांनी विजेत्या विद्यार्थ्यांचे तसेच प्रशिक्षक श्री. परमानंद बेलभक्ते यांचे अभिनंदन केले. शिक्षकवृंद, क्रीडा विभाग आणि प्रशिक्षकांनीही विद्यार्थ्यांचे कौतुक करून त्यांच्या उज्ज्वल क्रीडा भविष्यासाठी शुभेच्छा दिल्या.

# सुमन बाबाजी सोनवणे यांचे निधन



युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर- संगमनेर तालुक्यातील राजापूर येथील ज्येष्ठ महिला कै. गं.भा. सुमन बाबाजी सोनवणे यांचे बुधवारी रात्री दुःखद निधन झाले. त्यांच्या निधनाने सोनवणे परिवारावर शोककळा पसरली आहे. त्यांचा अंत्यविधी गुरुवारी सकाळी राजापूर-म्हाळुंगी तीरी शोकाकुल वातावरणात करण्यात आला. यावेळी विविध क्षेत्रातील नागरिक, नातेवाईक व आप्तेष्ट मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कै. सुमन सोनवणे यांच्या पश्चात विठ्ठल बाबाजी सोनवणे, भारत बाबाजी सोनवणे, योगेश बाबाजी सोनवणे हे मुले, मुलगी सौ. रंजना संपत वर्षे, सुना, नातवंडे असा परिवार आहे.

दैनिक युवावार्ता परिवाराच्या वतीने कै. सुमन बाबाजी सोनवणे यांना भावपूर्ण श्रद्धांजली.

Yuvavarta.in
VISIT INSTAGRAM
daily_yuvavarta
VISIT Facebook
Daily yuvavarta

SUBSCRIBE DAINIK YUVAVARTA YOUTUBE CHANNEL

# प्रवरा दूध उत्पादक संस्थेने केला तुकाराम मुंढे यांच्या अभिनंदनाचा ठराव



युवावार्ता (प्रतिनिधी)

धांदरफळ खुर्द - प्रवरा दूध उत्पादक सहकारी संस्था, धांदरफळ खुर्दची वार्षिक सर्वसाधारण सभा संस्थेचे चेअरमन दत्तात्रय पांडुरंग कोकणे यांच्या अध्यक्षतेखाली उत्साहात पार पडली. यावेळी संस्थेचे सर्व संचालक मंडळ, सभासद तसेच दूध उत्पादक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

या सभेत संस्थेने सभासद व दूध उत्पादकांच्या हिताच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण निर्णय घेत आर्थिक वर्षासाठी प्रतिलिटर १ रुपया १० पैसे रिबेटची तरतूद केली.

यावेळी अन्न भेसळ तसेच दूध भेसळयुक्त पदार्थांविरोधात कडक कारवाई केल्याबद्दल एफडीएचे तुकाराम मुंढे यांच्या कार्याचे सभेत कौतुक करण्यात आले. त्यांच्या कारवाईमुळे दूध भेसळीला आळा बसण्यास मदत झाली असून, ग्राहकांना चांगल्या प्रतीचे दूध मिळण्याबरोबरच दूध उत्पादकांच्या दुधाला चांगला भाव मिळण्यासही सकारात्मक परिणाम झाला असल्याचे सभेत नमूद करण्यात आले. या उल्लेखनीय कार्याबद्दल तुकाराम मुंढे यांच्या अभिनंदनाचा ठराव प्रवरा दूध उत्पादक सहकारी संस्थेच्या वार्षिक सर्वसाधारण सभेत एकमताने मंजूर करण्यात आला. सभेच्या अध्यक्षस्थानी चेअरमन दत्तात्रय पांडुरंग कोकणे होते. यावेळी संचालक मंडळ, सभासद व दूध उत्पादकांनी विविध विषयांवर चर्चा करून संस्थेच्या प्रगतीसाठी मार्गदर्शक सूचना केल्या.

# अगस्ती विद्यालयात विद्यार्थ्यांनी साकारल्या पर्यावरणपूरक गणेशमूर्ती

युवावार्ता (प्रतिनिधी)

गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव देत पर्यावरण संवर्धनाचा संदेश देण्यासाठी अगस्ती विद्यालयात 'गणपती बनवा' कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. विद्यार्थ्यांनी माती व पर्यावरणपूरक साहित्याचा वापर करून आकर्षक गणेशमूर्ती साकारल्या.

कला शिक्षक निशांत बिबवे व श्रीओम सहाणे यांच्या मार्गदर्शनाखाली झालेल्या या कार्यशाळेत विद्यार्थ्यांना मूर्तीची रचना, आकार, सुबकता व कलात्मक बारकावे समजावून सांगण्यात आले. स्वतःच्या कल्पनेतून गणेशमूर्ती साकारताना विद्यार्थ्यांमध्ये उत्साह दिसून आला. या उपक्रमातून विद्यार्थ्यांची सर्जनशीलता, हस्तकौशल्य व सौंदर्यदृष्टी विकसित होण्याबरोबरच 'पर्यावरणपूरक गणेशोत्सव साजरा करूया' हा संदेश देण्यात आला. विद्यालयाच्या पदाधिकाऱ्यांसह मुख्याध्यापक, शिक्षक, पालक व शिक्षणप्रेमींनी उपक्रमाचे कौतुक केले.

पान १ वरून

## दोन दुचाकींची...

नव्या वाहनाचा आनंद दोन दिवसही टिकला नाही आणि काळाने शुक्ला कुटुंबावर घाला घातल्याने परिसरात हळहळ व्यक्त होत आहे. अपघाताची माहिती मिळताच राजूर पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली. अपघातग्रस्त दोन्ही वाहने पोलिसांनी ताब्यात घेऊन पोलीस ठाण्यात जमा केली आहेत. याप्रकरणी राजूर पोलीस ठाण्यात अकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली असून सहाय्यक पोलीस निरीक्षक किशोर पवार यांच्या मार्गदर्शनाखाली पुढील तपास सुरू आहे. या भीषण अपघातामुळे राजूर परिसरात शोककळा पसरली आहे.

# संगमनेरमध्ये भक्तिमय वातावरणात श्री जिव्हेश्वर जन्मोत्सव उत्साहात

युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर- संगमनेर येथील स्वकुळ साळी समाजाच्या वतीने भगवान श्री जिव्हेश्वर जन्मोत्सव मोठ्या भक्तिभावाने व उत्साहात साजरा करण्यात आला. शनी मंदिर रोडवरील रंगार गल्लीतील लक्ष्मीनारायण देवस्थान ट्रस्ट येथे विविध धार्मिक व सामाजिक उपक्रमांचे आयोजन करण्यात आले. या सोहळ्यास समाजबांधव तसेच भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

पहाटे पाच वाजता दत्ताभाऊ निचळ दाम्पत्याच्या हस्ते हस्थे अभिषेक करण्यात आला. सकाळी सराफ ताई यांच्या हस्ते जिज्ञेश्वर ग्रंथवाचन व अनिल ढोरे दाम्पत्याच्या हस्ते सत्यनारायण महापूजा पार पडली. त्यानंतर भगवान श्री जिज्ञेश्वर जन्मोत्सव उत्साहात साजरा करण्यात आला. सकाळी नऊ वाजता जिज्ञेश्वर भवन येथे वाचनालय व अभ्यासिका इमारतीचे भूमिपूजन करण्यात आले. या प्रकल्पाचे काम मनोज उपरे यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू असून, बांधकाम प्रकल्प प्रमुख म्हणून अनिल ढोरे व राम तांबे कार्यरत आहेत. विद्यार्थ्यांना अभ्यासासाठी हक्काची सुविधा उपलब्ध करून देण्याचा या उपक्रमाचा उद्देश आहे. यावेळी दिवंगत समाजबांधवांच्या स्मरणार्थ विविध वस्तू समाजाला अर्पण करण्यात आल्या. सुशीलताई पाटणकर यांनी अर्जुनशेठ पाटणकर यांच्या स्मरणार्थ इलेक्ट्रिक गिझर, इंदुमतीताई पाटणकर यांनी रत्नाकर पाटणकर यांच्या स्मरणार्थ १५ गाद्या, विलासशेठ मेंद्रे यांनी पद्माताई मेंद्रे यांच्या स्मरणार्थ १५ गाद्या, तर भारतशेठ भागवत यांनी राधाकिसन भागवत यांच्या स्मरणार्थ २० गाद्या दिल्या. सायंकाळी पालखी पूजनानंतर पारंपरिक वाद्यांच्या गजरात मिरवणूक काढण्यात आली.


**जागा विकणे आहे**
अतिशय उत्तम लोकेशन मधील मालदाड रोड, स्टेट बँक कॉलनी लगतची तहसील N. A. व सरकारी मोजीणी झालेली २ गुंठे उत्तरमुखी रहिवाशी चौरस जागा विकणे आहे.
- संपर्क -
9890468212

**पाहिजेत**
सोनोग्राफी सेंटरसाठी मुलगी पाहिजे
कॉम्प्युटर व इंग्रजी टायपिंग येणे आवश्यक
(२ जागा त्वरीत भरणे आहे)
कामाची वेळ दु. १२ ते ८
संपर्क- जाधव सोनोग्राफी सेंटर
मर्चंट बँकेसमोर, नविन नगर रोड, संगमनेर
9307188862

**पाहिजेत**
सेल्समन
(महिला/ युवती प्राधान्य)
लिरा द कॉस्मेटिक्स झोन
वृंदावन अपार्टमेंट, गणेश नगर
मो. 7499630747

**नोकरीची सुवर्णसंधी**
श्री गणेश टायर्स
अकाऊंटंट - १
टॅली, जीएसटी ज्ञानास प्राधान्य
सेल्स एक्झीक्युटिव्ह - १
बॅटरी व इंजिन ऑईलच्या विक्री क्षेत्रातील अनुभव
अनुभावानुसार आकर्षक पगार
पत्ता - तीन बत्ती चौक, संगमनेर
८९९९८६२७५९

**पाहिजेत**
राजवीर फार्मा
मेडीकल एजन्सी कामाकरिता फक्त गरजुंनी संपर्क साधावा
पुरूष – ४ जागा
(वय- १८ ते ४०)
रविवार सुट्टी असते
आकर्षक पगार व बोनस
ठिकाण- जाणता राजा रोड, मुथुट फासनान्स पाठीमागे,२ नं गल्ली, संगमनेर
8669184141

**पाहिजेत**
युवा ध्येय वृत्तपत्र संगमनेर कार्यालयासाठी अर्जंट पाहिजे
उपसंपादक - १ M
जाहिरात व्यवस्थापक - १ M
डिझायनर - १ M/F
टेलिकॉलर - १ M/F
कार्यालय - युवा ध्येय, विठ्ठल स्मृती कॉम्प्लेक्स, अकोले रोड, संगमनेर
फोन (०२४२५)२६१८७२
७७६८०७९२७२,९३७०७७३५०४

**भाड्याने देणे आहे**
सर्व सुविधायुक्त ०१ बीएचके रो - हाऊस भाड्याने देणे आहे
सुकेवाडी रोड, संगमनेर
8282825818

**बालाजी गॅस, संगमनेर पाहिजेत**
कॉम्प्युटर ऑपरेटर
(२ जागा, १ महिला, १ पुरूष)
योग्य पगार व इतर सवलती
- संपर्क -
8600828485
9370025610

**पाहिजेत**
स्पेशल सिक्युरिटी फोर्स व बाऊन्सर सर्विसेस
सिक्युरिटी गार्ड - ५
महिला - ३
सफाई कर्मचारी - ५
हेल्पर - ५
पार्ट टाइम /फुल टाइम काम मिळेल ( सेक्युरिटी गार्ड
संपर्क - तिरंगा चौक, मालदाड रोड, संगमनेर
7709828846

**कामासाठी मुले, मुली पाहिजेत**
अकाऊंटंट - १ (म.)
हेल्पर - १ (पु.)
सेल्समन - १ (पु./ म.)
कामाचा अनुभव आवश्यक
9422905155
9763232269

**पाहिजेत**
जानकीराम गंगाधर काजळे ज्वेलर्ससाठी
सेल्स एक्झीक्युटिव्ह -४
मार्केटिंग एक्झीक्युटिव्ह -४
हेल्पर - २
मेन रोड, संगमनेर
7588249849



SR THORAT — JOB — GAGANGIRI PACKAGED PURITY

| Sr. No. | Post | QTY | Qualification and Experience |
|---|---|---|---|
| 1 | Security Guard | 5 | Experience Minimum 5 Year (Ex-Servicemen preferred) |
| 2 | Fitter/Welder/ Mechanical/ Electrical/ Refrigeration | 5 | ITI,DME or any Graduate, Experience Minimum 3 Year, Age below 30 Year |
| 3 | Data Operator/ Supervisor | 5 | Any Graduate, Experience Minimum 3 Year, Age below 30 Year |
| 4 | Chemist | 5 | B.Sc. Experience Minimum 3 Year, Age below 30 Year |

Office Address-S.R.Thorat Milk Products Pvt.Ltd, Rajapur Road,Sangamner, Dist- Ahilyanagar
Mobile Number – 9860100936/937
Sent the CV Following E-Mail Id:
admin@srthoratmilk.com / hr@srthoratmilk.com




# कौठे मलकापूरमध्ये पोलीस बंदोबस्तात सौर प्रकल्पाचे काम सुरू

## महायुतीच्या आंदोलनानंतर प्रकल्प मार्गी



संगमनेर - पठार भागातील साकूर परिसरातील कौठे मलकापूर येथे मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजनेअंतर्गत प्रस्तावित सौर ऊर्जा प्रकल्पाला सुरुवातीपासूनच विरोध होत असताना अखेर प्रत्यक्ष कामाला सुरुवात झाली आहे. सुमारे २७ एकर शासकीय क्षेत्रावर उभारण्यात येणाऱ्या या ७ मेगावॅट क्षमतेच्या प्रकल्पाचे काम कडेकोट पोलीस बंदोबस्तात सुरू करण्यात आले असून, पुढील तीन ते चार महिन्यांत प्रकल्पाचे काम पूर्ण होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

कौठे मलकापूर येथील सरकारी गट क्रमांक १६२ मधील १०.८३ हेक्टर म्हणजेच सुमारे २७ एकर शासकीय जागेवर हा प्रकल्प उभारण्यात येत आहे. याच जागेवर औद्योगिक वसाहत प्रस्तावित असल्याने सौर प्रकल्पाच्या उभारणीवरून गेल्या काही दिवसांपासून संगमनेर तालुक्यात राजकीय वातावरण चांगलेच तापले आहे.

औद्योगिक वसाहतीसाठी प्रस्तावित जागेवर सौर ऊर्जा प्रकल्प उभारला जात असल्याचा आरोप करत महायुतीच्या वतीने १९ ऑगस्ट रोजी आंदोलन करण्यात आले होते. या आंदोलनातून सौर प्रकल्पाला विरोध दर्शवित औद्योगिक वसाहतीसाठी जागा उपलब्ध करून देण्याची मागणी करण्यात आली होती. दरम्यान, आमदार अमोल खताळ यांनीही या प्रकरणी मुख्यमंत्र्यांची भेट घेतली होती. मात्र, या घडामोडींनंतरही आता प्रत्यक्ष सौर प्रकल्पाच्या कामाला सुरुवात झाल्याने राजकीय चर्चेला उधाण आले आहे.

महायुतीच्या आंदोलनावर आमदार सत्यजित तांबे यांनी जोरदार टीका केली होती. आंदोलनाच्या भूमिकेवर प्रश्न उपस्थित करत त्यांनी महायुतीच्या आंदोलनाची खिल्ली उडवली होती. त्यामुळे हा विषय केवळ विकासकामापुरता मर्यादित न राहता संगमनेर तालुक्यातील राजकीय संघर्षाचा मुद्दा बनला आहे.

विशेष म्हणजे, मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजनेअंतर्गत होणाऱ्या प्रकल्पालाच महायुतीच्या नेत्यांकडून विरोध करण्यात आल्याने या भूमिकेचीही तालुक्यात चर्चा झाली. प्रकल्पासंदर्भातील प्रशासकीय प्रक्रिया, जागेची उपलब्धता आणि शासनाचे निर्णय याबाबत पुरेशी माहिती घेण्यात आली होती का, असा सवालही आता उपस्थित होत आहे. दरम्यान, संबंधित सौर प्रकल्पासाठी आवश्यक प्रशासकीय प्रक्रिया यापूर्वीच पूर्ण झाल्याचे सांगण्यात येत आहे. त्यानंतर आता प्रत्यक्ष काम सुरू झाले असून, प्रकल्पस्थळी यंत्रसामग्री दाखल झाली आहे. विविध कामांना वेग देण्यात आला असून, कोणताही अडथळा निर्माण होऊ नये आणि कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न उद्भवू नये, यासाठी मोठा पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे.

प्रकल्पाच्या कामात अडथळा आणण्याचा किंवा कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण करण्याचा प्रयत्न झाल्यास संबंधितांवर नियमानुसार कारवाई केली जाऊ शकते, अशी प्रशासनाची भूमिका आहे. त्यामुळे कौठे मलकापूर परिसरात सौर प्रकल्पाचे सुरू झालेले काम आणि त्याभोवतीचे राजकारण याची जोरदार चर्चा सुरू आहे.

आंदोलनानंतरही काम सुरू; आता पुढील भूमिका काय?

महायुतीच्या आंदोलनानंतरही प्रकल्पाचे काम प्रत्यक्ष सुरू झाल्याने आंदोलनाच्या परिणामकारकतेबाबतही प्रश्न उपस्थित होत आहेत. आंदोलन करूनही काम थांबले नसल्याने आता महायुतीचे नेते याबाबत कोणती भूमिका घेतात, याकडे संपूर्ण तालुक्याचे लक्ष लागले आहे. दरम्यान, सुमारे २७ एकर शासकीय क्षेत्रावर उभारण्यात येणाऱ्या या ७ मेगावॅट क्षमतेच्या प्रकल्पामुळे मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजनेअंतर्गत परिसरातील कृषी वीजपुरवठ्याला फायदा होण्याची शक्यता आहे. स्थानिक शेतकऱ्यांनाही याचा अप्रत्यक्ष लाभ मिळण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

औद्योगिक वसाहतीसाठी प्रस्तावित जागा आणि सौर ऊर्जा प्रकल्प यावरून निर्माण झालेला वाद आगामी काळात संगमनेरच्या राजकारणात आणखी रंगण्याची शक्यता असून, आता महायुतीच्या पुढील भूमिकेकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

# भूताच्या अफवेला सनदी अधिकाऱ्यांचे सडेतोड उत्तर

अमरावती (वृत्तसंस्था)

आदिवासी समाजाला भगवान बिरसा मुंडा आणि तंट्या भिल्ल यांसारख्या लढवय्यांची परंपरा लाभली आहे. विद्यार्थ्यांनी ही लढाऊ वृत्ती कायम ठेवत अंधश्रद्धेला दूर सारून शिक्षणाची कास धरावी आणि वैज्ञानिक दृष्टिकोन अंगीकारावा, असे आवाहन जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांनी केले.

डोमा येथील शासकीय माध्यमिक व उच्च माध्यमिक आश्रमशाळेत मंगळवारी वरिष्ठ अधिकाऱ्यांनी विद्यार्थ्यांशी अनौपचारिक संवाद साधला. यावेळी आमदार केवलराम काळे, जिल्हाधिकारी आशिष येरेकर, मुख्य कार्यकारी अधिकारी सत्यम गांधी, पोलीस अधीक्षक निकेतन कदम, सहायक जिल्हाधिकारी सिद्धार्थ शुक्ला यांच्यासह अधिकारी उपस्थित होते. विद्यार्थ्यांनी अधिकाऱ्यांना 'तुम्ही आयएएस-आयपीएस कसे झालात?' असा प्रश्न विचारला. अधिकाऱ्यांनी आपल्या शैक्षणिक प्रवासातील अनुभव सांगत विद्यार्थ्यांनी मोठी स्वप्ने पाहून मेहनत व जिद्दीच्या जोरावर ती पूर्ण करावीत, असा संदेश दिला.

आश्रमशाळेत कथित भूत असल्याच्या चर्चेच्या पार्श्वभूमीवर अंधश्रद्धेला बळी न पडता प्रत्येक गोष्टीमागील वैज्ञानिक कारण समजून घेण्याचे आवाहन करण्यात आले. प्रसिद्ध खंजिरीवादक संदीपपाल महाराज यांनीही अंधश्रद्धेविरोधात विद्यार्थ्यांचे प्रबोधन केले. यावेळी अधिकाऱ्यांनी विद्यार्थ्यांसोबत भोजन केले तसेच मुलींच्या नवीन वसतिगृहाचे उद्घाटन केले. वरिष्ठ अधिकाऱ्यांनी विद्यार्थ्यांसोबत साधलेला हा संवाद त्यांच्या मनातील भीती दूर करून आत्मविश्वास वाढविणारा आणि भविष्यातील ध्येयासाठी प्रेरणा देणारा ठरला.

# दाढ खुर्द सोसायटीच्या अध्यक्षपदी भांड तर उपाध्यक्षपदी साळवे

युवावार्ता (प्रतिनिधी)

दाढ - संगमनेर तालुक्याच्या पूर्व भागातील दाढ खुर्द विविध कार्यकारी सेवा सोसायटीच्या अध्यक्षपदी साहेबराव गणपत भांड, तर उपाध्यक्षपदी सीताराम तुकाराम साळवे यांची बिनविरोध निवड झाली. या निवडीमुळे संस्थेच्या कारभाराची पुढील वाटचाल अधिक गतिमान होण्याची अपेक्षा व्यक्त होत आहे.

जलसंपदा तथा पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली आणि जनसेवा मंडळाच्या नेतृत्वाखाली ही निवड प्रक्रिया पार पडली. संस्थेच्या अध्यक्ष व उपाध्यक्षपदासाठी निवडणूक प्रक्रिया राबविण्यात आली. अध्यक्षपदासाठी साहेबराव भांड यांच्या नावाची सूचना रामलाल कहार यांनी मांडली, तर उपाध्यक्षपदासाठी सीताराम साळवे यांच्या नावाची सूचना मनोहर जोशी यांनी केली.

दोन्ही पदांसाठी प्रत्येकी एकच अर्ज दाखल झाल्याने निवडणूक निर्णय अधिकारी राजेश जोशी यांनी अध्यक्षपदी साहेबराव भांड आणि उपाध्यक्षपदी सीताराम साळवे यांची बिनविरोध निवड झाल्याचे जाहीर केले. निवड प्रक्रिया शांततेत व खेळीमेळीच्या वातावरणात पार पडली.

# डीजे विरोधात आवाज उठवणाऱ्या बापटांना पुण्यात मारहाण

पुणे (वृत्तसंस्था)

गणेशोत्सव किंवा सार्वजनिक उत्सावात डिजे किंवा लाऊडस्पीकर वापरावर बंदी आणावी, अशी मागणी पुण्यातील विद्यानंद बापट यांनी केली असून गेल्या काही दिवसांपासून ते याबद्दल आग्रही भूमिका मांडत आहेत. याबद्दल आज गुरुवारी एका वृत्तवाहिनीशी संवाद साधत असताना काही तरुणांनी त्यांना मारहाण केल्याची घटना घडली आहे.

या घटनेनंतर विद्यानंद बापट यांनी वृत्तवाहिनीशी बोलताना सांगितले की, मी वृत्तवाहिनीशी बोलत असताना काही टवाळखोरांनी येऊन मला बोलण्यापासून रोखले. त्यांना माझी भूमिका पटलेली नसावी. मी वाहिनीशी बोलत असताना निशस्त्र होतो, याचाच फायदा घेऊन त्यांनी मला बोलण्यापासून रोखले आणि मारहाण केली. मारहाण करणाऱ्यांना सवंग प्रसिद्धी हवी होती, म्हणून त्यांनी हे कृत्य केले असावे. मुद्द्यांना मुद्द्याने उत्तर देता येत नाही, त्यावेळी अशाप्रकारे भूमिका घेतली जाते. सदर घटना कॅमेऱ्यात कैद झाली आहे.

विद्यानंद बापट पुढे म्हणाले की, मला सवंग प्रसिद्धी कधीही नको आहे. पण ज्या लोकांना अशाप्रकारची प्रसिद्धी आहे, त्यांच्याकडून अशाप्रकारे मारहाण करता येते. वेडे लोक असतात ते. मी त्यांच्याकडे दुर्लक्ष करतो. माझा गणेशोत्सवाला कधीही आक्षेप नव्हता. मी फक्त डिजेच्या आवाजाला विरोध केला होता.

'विद्यानंद बापट यांना मशिदींवरच्या भोंग्यांचा त्रास होत नाही का?'; विचारताच म्हणाले, एकाने गाय मारली म्हणून दरम्यान या घटनेनंतर पुण्यातून प्रतिक्रिया उमटायला सुरुवात झाली आहे. काँग्रेसचे नेते प्रशांत जगताप यांनी या घटनेनंतर संताप व्यक्त केला. विद्यानंद बापट हे समस्त पुणेकरांची बाजू मांडत आहेत. त्यांचा धार्मिक सणांना अजिबात विरोध नाही. फक्त डिजेच्या माध्यमातून जी विकृती वाढत आहे. त्याला त्यांचा विरोध आहे. या संदर्भात बापट काही मुद्दे मांडत आहेत. पण सत्ताधारी मंडळीचा त्यांना पाठिंबा नाही. आज थेट त्यांना थेट मारहाण करण्यापर्यंत मजल गेली आहे. यावरून सत्ताधारी भाजपाची दादागिरी वाढली



असल्याचे दिसत आहे. चुकीच्या प्रवृत्तींना पुण्यात बळ दिले जात आहे, हेही यानिमित्ताने दिसले, अशी टीका प्रशांत जगताप यांनी दिली.

पुणे महानगरपालिकेत गणेशोत्सवाच्या पूर्वतयारीसाठी आयोजित केलेल्या बैठकीत डीजे आणि कर्णकर्कश ध्वनिक्षेपकांविरोधात भूमिका मांडल्यानंतर विद्यानंद बापट चर्चेत आले होते. त्यांच्या या भूमिकेला विरोध करत गणेश मंडळातील कार्यकर्त्यांनी बैठकीतून बाहेर काढले. या बैठकीचा व्हिडीओ व्हायरल झाल्यानंतर संपूर्ण राज्यात त्यांची चर्चा होऊ लागली. त्यानंतर विविध माध्यमांना त्यांनी मुलाखती देऊन आपली मागणी पुढे केली.

## दिनविशेष

२००१: — हेवलेट पॅकर्ड या कंपनीने संगणक क्षेत्रातील कॉम्पॅक कॉर्पोरेशन ही बलाढ्य कंपनी २५ अब्ज डॉलर्सला विकत घेतली.

१९९८: — स्टॅनफोर्ड विद्यापीठातील लॅरी पेज व सर्गेइ ब्रिन या दोन विद्यार्थ्यांनी गुगलची स्थापना केली.

१९७२: — मार्क स्पिटझ हा एकाच ऑलिम्पक स्पर्धेत ७ सुवर्णपदके मिळवणारा पहिला खेळाडू बनला.

१९३७: — प्रभातच्या संत तुकाराम या चित्रपटाची जगातल्या तीन उत्कृष्ट चित्रपटांपैकी एक चित्रपट म्हणून निवड झाली.

## जन्म

१९७१: लान्स क्लूसनर — दक्षिण अफ्रिकेचा अष्टपैलू क्रिकेटपटू

१९६४: आदेश श्रीवास्तव — भारतीय गायक-गीतकार (निधन: ५ सप्टेंबर २०१५ )

१९६२: किरण मोरे — भारतीय क्रिकेटपटू

१९५२: ऋषी कपूर — हिंदी चित्रपटसृष्टीतील भारतीय अभिनेता, दिग्दर्शक आणि निर्माता म्हणून ऋषी कपूर प्रसिद्ध — राष्ट्रीय चित्रपट पुरस्कार - सर्वोत्कृष्ट बालकलाकार, फिल्मफेअर सर्वोत्कृष्ट अभिनेता, फिल्मफेअर जीवनगौरव पुरस्कार (निधन: ३० एप्रिल २०२० )

१९४१: सुशीलकुमार शिंदे — भारतीय राजकारणी, महाराष्ट्राचे १५ वे माजी मुख्यमंत्री आणि माजी केंद्रीय गृहमंत्री म्हणून प्रसिद्ध — राष्ट्रीय नागरिक पुरस्कार, बसव भूषण पुरस्कार, आदर्श युवा सन्मान

१९३७: शंकर सारडा — साहित्यिक व समीक्षक

१९३१: अँथनी डी मेलो — भारतीय-अमेरिकन धर्मगुरू आणि मानसोपचारतज्ज्ञ (निधन: २ जून १९८७ )

१९२७: जॉन मॅककार्थी — लिस्प प्रोग्रॅमिंग लँग्वेजचे जनक (निधन: २४ ऑक्टोबर २०११ )

१९२३: राम किशोर शुक्ला — भारतीय वकील आणि राजकारणी (निधन: ११ डिसेंबर २००३ )

१९१३: पी. एन. हक्सर — प्रशासक व मुत्सद्दी, पंतप्रधानांचे मुख्य सचिव (निधन: २५ नोव्हेंबर १९९८ )

## मृत्यू

२०२२: सायरस पालोनजी मिस्त्री — भारतीय वंशाचे आयरिश उद्योगपती आणि टाटा समूहाचे माजी अध्यक्ष म्हणून ते प्रसिद्ध — प्रमुख औपचारिक पुरस्काराची विश्वसनीय नोंद उपलब्ध नाही (जन्म: ४ जुलै १९६८ )

२०२२: रामचंद्रन मोकेरी — भारतीय रंगमंच अभिनेते (जन्म: १९४७ )

२०२२: राम नरेश रावत — भारतीय राजकारणी, उत्तर प्रदेशचे आमदार (जन्म: ७ मे १९६७ )

२०१५: विल्फ्रेड डी डिसोझा — भारतीय सर्जन आणि राजकारणी (जन्म: २३ एप्रिल १९२७ )

२०१२: हांक सूफी — भारतीय गायक-गीतकार (जन्म: ३ मार्च १९५२ )

२०१२: सय्यद मुस्तफा सिराज — भारतीय लेखक (जन्म: १३ ऑक्टोबर १९३० )

२०००: मोहम्मद उमर मुक्री — विनोदी कलाकार व चरित्र अभिनेते (जन्म: ५ जानेवारी १९२२ )

१९९७: डॉ. धर्मवीर भारती — हिंदी लेखक, कवी, नाटककार, पत्रकार (जन्म: २५ डिसेंबर १९२६ )




## दररोज थोडा अभ्यास.. यशाकडे एक नवे पाऊल!

स्पर्धा परीक्षा, विद्यार्थी आणि ज्ञानप्रेमी वाचकांसाठी दैनिक युवावार्ताचा हा विशेष उपक्रम. या सदरामध्ये दररोज दिनविशेष, जयंती, पुण्यतिथी, ऐतिहासिक घटना, महत्त्वाच्या व्यक्तींची माहिती, सामान्य ज्ञान व स्पर्धा परीक्षांसाठी उपयुक्त तथ्ये संक्षिप्त आणि अभ्यासपूर्ण स्वरूपात प्रकाशित करण्यात येतील.

**०४ सप्टेंबर**

## प्रभातच्या संत तुकाराम या चित्रपटाची जगातल्या तीन उत्कृष्ट चित्रपटांपैकी एक चित्रपट म्हणून निवड झाली.

१९३७ हे वर्ष मराठी चित्रपटसृष्टीच्या इतिहासातील अत्यंत महत्त्वाचे वर्ष मानले जाते. याच वर्षी प्रभात फिल्म कंपनीने निर्मित केलेला 'संत तुकाराम' हा चित्रपट प्रदर्शित झाला आणि भारतीय चित्रपटाला आंतरराष्ट्रीय पातळीवर विशेष ओळख मिळवून दिली. संत तुकाराम महाराजांच्या जीवनावर आधारित या चित्रपटाने भक्ती, अध्यात्म, सामाजिक समता आणि माणुसकीचा संदेश प्रभावीपणे मांडला.'संत तुकाराम' या चित्रपटाची निर्मिती प्रभात फिल्म कंपनीने केली होती. दिग्दर्शन विष्णुपंत गोविंद दामले आणि शेख फत्तेलाल यांनी केले. संत तुकारामांची मध्यवर्ती भूमिका विष्णुपंत पागनीस यांनी साकारली. त्यांच्या अभिनयामुळे तुकाराम महाराजांचे साधेपण, भक्ती, करुणा आणि समाजाविषयीची आस्था पडद्यावर अत्यंत प्रभावीपणे व्यक्त झाली.चित्रपटाची कथा संत तुकाराम महाराजांच्या जीवनातील प्रसंगांवर आधारित होती. तत्कालीन समाजातील जातिभेद, कर्मकांड, अंधश्रद्धा आणि सामाजिक विषमता यांच्याविरोधात तुकारामांनी मांडलेला मानवतावादी विचार चित्रपटातून समोर आला. त्यांच्या अभंगांच्या माध्यमातून भक्तीबरोबरच सर्व माणसे समान आहेत, माणुसकी हाच खरा धर्म आहे, हा संदेश प्रेक्षकांपर्यंत पोहोचला.त्या काळात भारतीय चित्रपटसृष्टी अद्याप बाल्यावस्थेत होती. तांत्रिक साधने मर्यादित होती, ध्वनीपट नुकतेच लोकप्रिय होत होते आणि भारतीय चित्रपटांना आंतरराष्ट्रीय स्तरावर फारशी ओळख नव्हती. अशा परिस्थितीत 'संत तुकाराम'ने आपल्या आशय, अभिनय, दिग्दर्शन आणि कलात्मक मांडणीच्या जोरावर जगाचे लक्ष वेधून घेतले.१९३७ मध्ये व्हेनिस येथे झालेल्या आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवात 'संत तुकाराम'ची निवड आंतरराष्ट्रीय स्तरावरील उत्कृष्ट चित्रपटांमध्ये झाली. अनेकदा या घटनेचा उल्लेख 'जगातील तीन उत्कृष्ट चित्रपटांपैकी एक' असा केला जातो. त्यामुळे मराठी चित्रपटासाठी ही ऐतिहासिक कामगिरी ठरली. भारतीय चित्रपटाने केवळ मनोरंजनाचे माध्यम म्हणून नव्हे, तर गंभीर कलात्मक अभिव्यक्तीचे माध्यम म्हणूनही जागतिक पातळीवर स्थान मिळवू शकते, हे या चित्रपटाने सिद्ध केले.'संत तुकाराम'चे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे त्याचा सामाजिक आशय. संत तुकारामांचे विचार महाराष्ट्राच्या सांस्कृतिक आणि वारकरी परंपरेशी जोडलेले असले, तरी त्यातील माणुसकी, समता आणि नैतिकतेचा संदेश सार्वत्रिक होता. त्यामुळे भाषेची सीमा ओलांडून या चित्रपटाने प्रेक्षकांवर प्रभाव निर्माण केला.आज जवळपास नऊ दशके उलटून गेल्यानंतरही 'संत तुकाराम'चे महत्त्व कमी झालेले नाही.

# शंकर सारडा : मराठी साहित्यविश्वातील सजग समीक्षक

**जन्मदिन विशेष**

४ सप्टेंबर १९३७ रोजी महाबळेश्वर येथे जन्मलेले शंकर सारडा हे मराठी साहित्यविश्वातील महत्त्वाचे साहित्यिक, समीक्षक, पत्रकार, संपादक आणि बालसाहित्यकार म्हणून ओळखले जातात. लहानपणापासूनच त्यांना वाचन आणि लेखनाची आवड होती. किशोरवयातच त्यांचे लेखन विविध नियतकालिकांमधून प्रसिद्ध होऊ लागले. पुढे साहित्य आणि पत्रकारिता हीच त्यांच्या आयुष्याची प्रमुख क्षेत्रे बनली.सारडा यांचे वैशिष्ट्य म्हणजे त्यांनी केवळ स्वतः लेखन केले नाही, तर नव्या लेखकांचे साहित्य वाचकांपर्यंत पोहोचविण्याचे महत्त्वपूर्ण काम केले. साहित्यिक कलाकृतींकडे चिकित्सक नजरेने पाहताना त्यांनी लेखकाच्या गुण-दोषांचे संतुलित विश्लेषण केले. त्यामुळे त्यांच्या समीक्षेला मराठी साहित्यविश्वात विशेष महत्त्व प्राप्त झाले.



लोकप्रिय साहित्याकडेही त्यांनी गांभीर्याने पाहिले आणि विविध प्रकारच्या साहित्याला व्यासपीठ मिळवून देण्याचा प्रयत्न केला.पत्रकार म्हणूनही त्यांची कारकीर्द उल्लेखनीय होती. 'महाराष्ट्र टाइम्स'च्या रविवार पुरवणीला आकार देण्यात त्यांचा महत्त्वाचा वाटा होता. 'महाराष्ट्र साहित्य पत्रिका', 'साधना', 'देशदूत', 'लोकमत' तसेच 'ग्रंथजगत' अशा विविध माध्यमांमधून त्यांनी साहित्यविषयक लेखन केले. साहित्य आणि पत्रकारिता यांचा प्रभावी मेळ घालत त्यांनी नव्या लेखकांची पुस्तके, कविता आणि कादंबऱ्यांची परीक्षणे वाचकांसमोर आणली.बालसाहित्य हे त्यांच्या लेखनातील विशेष क्षेत्र होते. त्यांनी १९५० पासून सातत्याने बालसाहित्य लिहिले. चतुर चंपा, मधुमुरली, राणीपरीची कृपा, झिपऱ्या आणि रत्नी, गुराख्याचा पोर, चंद्रपरी आणि सोनसखा, मला मोठं व्हायचंय, जादूमंतर छू अशा अनेक पुस्तकांतून त्यांनी बालवाचकांसाठी मनोरंजनाबरोबरच कल्पनाशक्ती आणि मूल्यांची जडणघडण करणारे साहित्य निर्माण केले.सारडा यांनी ६० हून अधिक पुस्तके लिहिली आणि दोन हजारांहून अधिक पुस्तकांचे समीक्षण केले, अशी नोंद विविध चरित्रात्मक स्रोतांमध्ये आढळते. त्यांनी टॉल्स्टॉय आणि गिबन यांसारख्या लेखकांच्या साहित्याचे अनुवादही केले. समीक्षा, बालसाहित्य, पत्रकारिता, संपादन आणि साहित्यप्रसार अशा अनेक क्षेत्रांत त्यांनी केलेले काम त्यांच्या बहुआयामी व्यक्तिमत्त्वाची साक्ष देते.साहित्यिक उपक्रमांमध्येही सारडा यांचा सक्रिय सहभाग होता. विविध साहित्य संमेलने आणि साहित्यिक संस्थांच्या माध्यमातून त्यांनी साहित्यप्रसाराचे कार्य केले. अखिल भारतीय बालकुमार साहित्य संमेलनासह अनेक साहित्यिक उपक्रमांशी त्यांचा संबंध राहिला. नव्या लेखकांना प्रोत्साहन देणे आणि वाचकांमध्ये साहित्याची आवड निर्माण करणे, ही त्यांच्या कार्याची महत्त्वाची बाजू होती.

पाईल्सचा कायमचा उपाय !
वेदना, रक्तस्त्राव, जळजळ?
आता सुरक्षित आणि सोप उपचार उपलब्ध
पाईल्स (PILES) | फिशर (FISSURE) | फिस्टुला (FISTULA)
फोन नं. ०२४२५-२२००५०
संपर्क - 7219100100
ताम्हाणे हॉस्पिटल
आधुनिक उपचार पद्धती
- कमी वेदना, जलद बरे होणे
- लेझर व प्रगत तंत्रज्ञान
- अनुभवी जज्ञ डॉक्टरांचा सल्ला
- गोपनीयतेची पूर्ण काळजी
सुरक्षित उपचार | अनुभवी टीम | लवकर आराम | आपली सेवा आमची बांधिलकी
पत्ता - इंदिरानगर, गल्ली नं. १०, विठ्ठल मंदिराजवळ, अकोले बायपास रोड, संगमनेर

दैनिक
# युवावार्ता
परिवर्तनाचा पुरस्कर्ता
Web : www.yuvavarta.in/com
Mail : dailyyuvavarta@gmail.com

आपल्या व्यवसायाची जाहीरात येथे प्रसिद्ध करा
संपर्क
८८३०५०८२४४ ८३८०९६६६०४
७६२०३८८२३०



श्री महाकालेश्वराचे अलौकिक दर्शन!
श्रावण मासानिमित्त भक्ती शक्ती मंदिरात, उज्जैनच्या श्री महाकालेश्वराचा प्रतिरूपाचे दर्शनाचा लाभ घ्यावा.
श्रावण मासारंभ निमित्त सर्वांना हार्दिक शुभेच्छा !
भक्ती शक्ती मंदिर
डेरे फाउंडेशन कॅम्पस, कऱ्हे फाटा, नाशिक-पुणे हायवे, संगमनेर
॥ ॐ नमः शिवाय ॥ ॥ श्री दत्तात्रेय नमः ॥ ॥ श्री विठ्ठल रुक्मिणी ॥

## कायद्याचा अंमल की सत्तेचा अहंकार ?

### सामाजिक कार्यकर्ते संतोष पंडित यांच्या अटकेने पुण्यात संताप



पुणे (वृत्तसंस्था)

शहरातील रस्त्यांवरील खड्डे, भ्रष्टाचाराचे प्रश्न तसेच राजकीय व्यक्तींच्या वाहनांवरील नियमबाह्य नंबर प्लेट यांसारखे मुद्दे सोशल मीडियाच्या माध्यमातून जनतेसमोर मांडणारे सामाजिक कार्यकर्ते संतोष पंडित यांना रात्रीच्या सुमारास अटक करण्यात आल्याने पुण्यात संतापाची लाट निर्माण झाली आहे.

संतोष पंडित यांनी नागरिकांच्या दैनंदिन समस्यांवर आवाज उठवत प्रशासनाला जाब विचारला होता. तसेच आमदार गोपीचंद पडळकर यांच्यासह काही राजकीय व्यक्तींच्या वाहनांवरील चुकीच्या अथवा नियमबाह्य नंबर प्लेटचा मुद्दाही त्यांनी उपस्थित केला होता. मात्र, नागरिकांचे प्रश्न मांडणाऱ्या व्यक्तीला मध्यरात्री १ वाजता अटक करण्यात आल्याने या कारवाईमागे नेमके कारण काय, असा सवाल उपस्थित केला जात आहे.

सामान्य नागरिकाने प्रशासनाच्या कामावर प्रश्न उपस्थित करणे हा गुन्हा आहे का? असा प्रश्नही आता नागरिकांकडून विचारला जात आहे. राजकारणी आणि प्रशासनाने सोडवायचे प्रश्न एखादा नागरिक सोशल मीडियाच्या माध्यमातून मांडत असेल, तर त्याला उत्तर देण्याऐवजी दबाव, दडपशाही किंवा अटकेचा मार्ग स्वीकारला जात असेल, तर ही बाब लोकशाहीच्या दृष्टीने गंभीर असल्याची प्रतिक्रिया व्यक्त होत आहे.

या प्रकरणात गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या गृह विभागाने अटकेमागील कायदेशीर आणि ठोस कारण जनतेसमोर पारदर्शकपणे मांडावे, अशी मागणी होत आहे. अटक कोणत्या गुन्ह्यात, कोणत्या कायदेशीर तरतुदींनुसार आणि कोणत्या परिस्थितीत करण्यात आली, याबाबत स्पष्टता देणे आवश्यक असल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे. सत्तेला प्रश्न विचारणाऱ्या आवाजाला दाबण्यापेक्षा त्या प्रश्नांची उत्तरे देणे, हीच लोकशाहीची खरी कसोटी आहे, अशी भावना व्यक्त करत संतोष पंडित यांच्या अटकेचा नागरिकांकडून निषेध करण्यात येत आहे. दरम्यान, या अटकेमुळे कायद्याचा अंमल झाला की सत्तेचा अहंकार दाखवण्यात आला, की लोकशाहीच्या अधिकारांवर गदा आणण्याचा प्रयत्न झाला? यावरून पुण्यात राजकीय आणि सामाजिक वर्तुळात चर्चा रंगली आहे.

## शांतीघाट दशक्रियेसाठी तातडीने खुला करा - जाखडी

### पुरानंतर प्रशासनाचे दुर्लक्ष; सर्वत्र गाळ, खड्डे अन् राडारोडा



युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर (- प्रवरा नदीला आलेल्या महापुरानंतर संगमनेर शहरातील म्हाळुंगी-प्रवरा संगमावरील शांतीघाटाची अवस्था अत्यंत दयनीय झाली आहे. दशक्रिया विधीसाठी विशेषतः विकसित करण्यात आलेला हा घाट अद्यापही नागरिकांसाठी सुरळीतपणे खुला झालेला नाही. घाटाकडे जाणाऱ्या रस्त्यावर महापुरात वाहून आलेला गाळ, माती, दगड, राडारोडा आणि ठिकठिकाणी पडलेले खड्डे यामुळे दशक्रिया विधीसाठी येणाऱ्या नागरिकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. यामुळे प्रशासनाने तातडीने शांतीघाट परिसराची स्वच्छता करून रस्ते खड्डेमुक्त करावेत, अशी मागणी पुरोहित प्रतिष्ठानचे अध्यक्ष भाऊ जाखडी यांनी प्रसिद्धीपत्रकाद्वारे केली आहे.

काही वर्षांपूर्वी दशक्रिया विधीच्या सोयीसाठी विकसित करण्यात आलेल्या या शांतीघाटावर नियमितपणे मोठ्या प्रमाणात दशक्रिया विधी पार पडतात. घाटाचा परिसर प्रशस्त, मोकळा आणि हवेशीर असल्याने एकाच वेळी मोठ्या संख्येने नागरिकांच्या उपस्थितीत विधी पार पाडणे शक्य होते. अनेक वेळा दशक्रिया विधीनिमित्त प्रवचनांचेही आयोजन केले जाते. तसेच विविध समाजांच्या प्रथेनुसार विधीनंतर भोजनाची व्यवस्था केली जाते. त्यामुळे शांतीघाट परिसराला नागरिकांच्या दृष्टीने विशेष महत्त्व आहे.

मात्र सध्या घाटाकडे जाणारा मार्गच खराब झाल्याने दशक्रिया विधी करण्यासाठी नागरिकांना अडचणींचा सामना करावा लागत आहे. महापुराला बरेच दिवस उलटूनही साफसफाई आणि रस्त्यांच्या दुरुस्तीबाबत ठोस कार्यवाही झालेली नसल्याने नागरिकांमधून नाराजी व्यक्त होत आहे.

पालिकेने कोणतीही दिरंगाई न करता शांतीघाट परिसरातील गाळ, राडारोडा व कचरा हटवावा. तसेच रस्त्यावर मुरूम टाकून खड्डे बुजवावेत आणि संपूर्ण परिसर स्वच्छ करून नागरिकांसाठी तातडीने वापरास योग्य करावा, अशी मागणी भाऊ जाखडी यांनी केली आहे.

दशक्रिया विधीसाठी येणाऱ्या नागरिकांच्या भावनांचा आणि धार्मिक विधींच्या गांभीर्याचा विचार करून पालिका प्रशासनाने या प्रश्नाकडे तातडीने लक्ष देणे गरजेचे आहे. सामाजिक कार्यकर्त्यांना आणि नागरिकांना दिसणाऱ्या समस्या संबंधित अधिकारी वर्गाच्या निदर्शनास का येत नाहीत? असा सवालही जाखडी यांनी उपस्थित केला असून, शांतीघाटाच्या दुरवस्थेबाबत प्रशासनाने आता तरी जागे व्हावे, अशी अपेक्षा व्यक्त केली आहे.

## ‘आदर्श राज्य शिक्षक’ पुरस्कारासाठी प्राचार्य डॉ. अरुण गायकवाड यांची निवड

युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - शिक्षण प्रसारक संस्थेच्या संगमनेर नगरपालिकेच्या कला, दा. ज. मालपाणी व ब. ना. सारडा विज्ञान महाविद्यालयाचे प्राचार्य प्रा. डॉ. अरुण हरी गायकवाड यांची सन २०२५-२६ या वर्षासाठी प्रतिष्ठेच्या ‘डॉ. जे. पी. नाईक आदर्श राज्य शिक्षक’ पुरस्कारासाठी निवड झाली आहे. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या कार्यक्षेत्रातून प्राचार्य संवर्गात त्यांची निवड झाल्याने संगमनेरच्या शैक्षणिक क्षेत्रात आनंदाचे वातावरण आहे.

उच्च शिक्षण विभागाच्या अखत्यारित राज्यातील विविध विद्यापीठांच्या कार्यक्षेत्रातील शासकीय, अशासकीय, अनुदानित, कायम विनाअनुदानित महाविद्यालये, संस्था तसेच समाजकार्य महाविद्यालयांमधील प्राचार्यांमधून या पुरस्कारासाठी निवड केली जाते. सन २०२५-२६ साठी प्राचार्य संवर्गातील



एकूण सात पुरस्कार जाहीर करण्यात आले असून, त्यापैकी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या कार्यक्षेत्रातून डॉ. गायकवाड यांची निवड झाली आहे.

महाविद्यालयाच्या शैक्षणिक, प्रशासकीय व गुणवत्ता वृद्धीच्या प्रक्रियेत डॉ. गायकवाड यांनी उल्लेखनीय योगदान दिले आहे. विद्यार्थीकेंद्रित शिक्षण, नवीन शैक्षणिक धोरणाची प्रभावी अंमलबजावणी, संशोधनाला चालना देणे तसेच कौशल्याधारित व्यावसायिक अभ्यासक्रमांचा विस्तार यासाठी त्यांनी विशेष पुढाकार घेतला.

महाविद्यालयाला स्वायत्त दर्जा मिळवून देण्याच्या प्रक्रियेतही त्यांच्या नेतृत्वाची महत्त्वपूर्ण भूमिका राहिली आहे. त्यांच्या या उल्लेखनीय शैक्षणिक व प्रशासकीय कार्याची दखल घेत ‘आदर्श राज्य शिक्षक’ पुरस्कारासाठी झालेली निवड ही संगमनेरच्या शैक्षणिक क्षेत्रासाठी अभिमानाची बाब मानली जात आहे.

डॉ. गायकवाड यांच्या निवडीबद्दल शिक्षण प्रसारक संस्थेचे पदाधिकारी, प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थ्यांनी त्यांचे अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

चैतन्य हॉस्पिटल
डॉ. जठार हॉस्पिटल, ताजणे मळा, नवीन नगर रोड, संगमनेर
- मेडि असिस्ट इन्शुरन्स प्रा.लि.
- पॅरामाऊंट हेल्थ इन्शुरन्स
- हेल्थ इंडिया इन्शुरन्स
- FHPL हेल्थ इन्शुरन्स
- इरिक्सन इन्शुरन्स प्रा.लि.
- बजाज आलियांज इन्शुरन्स
- एसबीआय जनरल इन्शुरन्स
- ईस्ट वेस्ट असिस्ट हेल्थ केअर
- मेडसेव टीपीए प्रा.लि.
- जेनिन्स इंडिया टीपीए लि.
- ICICI लोम्बार्ड हेल्थ केअर
- टाटा एआयजी इन्शुरन्स
- रिलायन्स जनरल इन्शुरन्स
- मुख्यमंत्री सहाय्यता निधी (CMRF)
सर्व प्रकारचे मेडिक्लेम कॅशलेस सुविधा उपलब्ध
- चोलामंडलम हेल्थ इन्शुरन्स
- नॅशनल इन्शुरन्स कं.
- न्यू इंडिया इन्शुरन्स कं.
- निवा बुपा हेल्थ इन्शुरन्स
- युनायटेड इंडिया इन्शुरन्स कं.
- स्टार हेल्थ इन्शुरन्स कं.
- दि ओरिएंटल इन्शुरन्स लि.
- एचडीएफसी एर्गो इन्शुरन्स
- युनायटेड हेल्थकेअर लि.
- Go digit हेल्थ इन्शुरन्स कं.
- मणिपाल सिग्ना हेल्थ इन्शु.
- एम.डी.इंडिया हेल्थकेअर
- विडाल हेल्थकेअर प्रा.लि.
- पोलिस कुटुंब कल्याण आरोग्य योजना (MPKAY)
02425 - 224761, मोबा. 7038170382

नोकरीची सुवर्णसंधी
'इन्वोफिक्स सोल्यूशन प्रायव्हेट लिमिटेड'
(सौर ऊर्जा कंपनी) या कंपनीस रायगड, रत्नागिरी व सिंधुदुर्ग जिल्ह्यांसाठी खालील पदांसाठी उमेदवारांची आवश्यकता आहे
पदे: Field Sales Executive
Business Development Manager
कार्य क्षेत्र : रायगड । रत्नागिरी । सिंधुदुर्ग
पात्रता
* कोणत्याही शाखेतील पदवीधर
* विक्री व मार्केटिंग क्षेत्रातील अनुभवास प्राधान्य
* उत्तम संवाद कौशल्य व प्रवासाची तयारी आवश्यक
* स्वतःची दुचाकी, वैध ड्रायव्हिंग लायसन्स असणे आवश्यक
सुविधा
आकर्षक वेतन, प्रोत्साहनपर इन्सेंटीव्ह, पेट्रोल भत्ता, वैद्यकीय विमा, पीएफ सुविधा
संपर्क - RSM (Raigad): 7030334196
HR Head : 7030334165

दर्शन टेक्सटाईल मार्केट
तुमच्या प्रत्येक लूकसाठी खास डिझाइन्स
30% ते 70% डिस्काउंट सेल
सेल नव्हे होलसेल सेल
मान्सून ऑफर
टी शर्ट | जिन्स | फॉर्मल ड्रेस
ब्लेज़र | जाकेट
संपर्क :- 8390005001 पत्ता:- जाणता राजा मार्ग, IDBI बँक समोर, संगमनेर 422605

सहकारमहर्षी भाऊसाहेब थोरात अमृतवाहिनी सह. बँक लि. घुलेवाडी
आर्थिक अडचण आहे का?
काळजी करु नका !
सोनेतारण कर्ज
कमीत कमी व्याजदर
जास्तीत जास्त कर्ज
बँकेच्या विविध सेवा सुविधांच्या अधिक माहितीसाठी आजच आपल्या जवळच्या शाखेशी संपर्क साधावा.
SMBT BANK
✻ कर्ज रक्कम वाढ । ✻ कर्ज व्याजदर कमी । ✻ कमीत कमी कागदपत्रे
सेवा सुविधांच्या अधिक माहितीसाठी जवळच्या शाखेशी संपर्क साधा
- शाखा - घुलेवाडी (मुख्यशाखा), मार्केट यार्ड, इंजि. कॉलेज विस्तार कक्ष, मेनरोड , तळेगाव, साकूर, घारगाव, आश्वी बु।।, संगमनेर खुर्द, निमोण, राहाता

मार्स युनिव्हर्स प्रायव्हेट लिमिटेड
टूर्स, ट्रॅव्हल्स आणि कॉर्पोरेट सर्व्हिसेस
तुमचे पाऊल मंगळावर ठेवण्यासाठी मार्स युनिव्हर्स सज्ज
प्रति व्यक्ती 59,000/-* (फुकेत, बँकॉक)
प्रति व्यक्ती 79,000/-* (व्हिएतनाम, सिंगापूर, बाली)
आंतरराष्ट्रीय टूर पॅकेजेस | कॉर्पोरेट इव्हेंट मॅनेजमेंट | मिटींग्स, इन्सेंटिव्ह टूर्स | विश्वसनीय सेवा उत्तम नियोजन
1 ला ग्रुप - 26 सप्टेंबर
2 रा ग्रुप - 1 ऑक्टोबर
3 रा ग्रुप - 10 ऑक्टोबर
संपर्क - किशोर सोनवणे 9309429705

कुटे हॉस्पिटल अँड लॅप्रोस्कोपी सेंटर
स्वास्थ्य रक्षणाय् रोग परिशमनाय्
- सर्जरी विभाग • डायलिसीस विभाग • हृदयरोग विभाग • जॉईंट रिप्लेसमेंट
- अतिदक्षता विभाग • सुपर स्पेशालिटी विभाग • मेडिसीन विभाग • स्पाईन सर्जरी
- अपघात विभाग • न्यूरोविभाग • अद्ययावत कॅथलॅब • मॉड्युलर ऑपरेशन थिएटर
सर्व मेडिक्लेम व कॅशलेस सुविधा पंतप्रधान व महात्मा ज्योतिराव फुले जनआरोग्य योजना ॲम्ब्युलन्स व २४ तास अत्यावश्यक सेवा
संपर्क क्रमांक - 8888882225
४० फुटी डीपी रोड, ताजणे मळा, नवीन नगर रोड, संगमनेर (०२४२५) २२६६८८, २२६६८६
डॉ. सोनाली प्र. कुटे (M.B.B.S.) Physician & Anasthhetist
डॉ. प्रदीप भाऊसाहेब कुटे (M.S.) Laproscopic Surgeon & Endoscopist

दैनिक युवावार्ता हे दैनिक, सौ. सुशीला किसन हासे, प्लॉट नं. ४/ब, सावतामाळी नगर, बी.एड्. कॉलेज रोड, संगमनेर-४२२६०५, जि. अ.नगर (महाराष्ट्र) यांनी आनंद प्रिंटर्स, प्लॉट नं. ४/ब, सावतामाळी नगर, बी.एड्.कॉलेज रोड, संगमनेर – ४२२६०५ जि. अहमदनगर (महाराष्ट्र) येथे छापून त्याच ठिकाणी प्रकाशित केले. संपादक सौ. सुशीला किसन हासे, मुद्रक, आनंद प्रिंटर्स, (सुशीला किसन हासे), फोन (०२४२५)२२५१२९. या अंकात प्रसिध्द झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक, संचालक सहमत असतीलच असे नाही. (संगमनेर न्यायक्षेत्र) Email - dailyyuvavarta@gmail.com, RNI No. MAHMAR/2007/24252 पोस्टाचा परवाना क्रं. BII/RNP/SRP/25/2023-25